# माती अन् मोती

ज. स. कानेटकर



म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2783

REFBK-0023870
REFBK-0023870

संदर्भ काव्य
२७५३
२३८७०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

( क्रु. मा. प. )
५०००-१२-८२

प्रकाशक
ज. स. कानेटकर
७/२ शहा – सदन;
राम – मारुती रस्ता,
दादर ( पश्चिम )
मुंबई ४०० ०२८

++

मुद्रक
मेघनाथ भगत
ललित मुद्रणालय,
२०९८ ए, धोत्री गल्ली, कोल्हापूर

++

सर्व हक्क लेखकाधीन

++

मुखपृष्ठ
मधुकर ओतारी,
स्टुडिओ मयूर, कोल्हापूर

++

मुद्रण व्यवस्था
आर्. व्ही. खेर, कोल्हापूर

++

२९ मार्च १९८३

++

मूल्य रुपये बारा

**परमपूज्य मातोश्री स्व. गोपिकाबाई तथा 'वाहिनी' हिला...**

आज माझ्या कविता–संग्रहाचे प्रकाशन.
आज मला तुझी उत्कटतेने आठवण येत आहे.
तुला वंदन करायला तुझा फोटोदेखील मजजवळ नाही.
तू अल्पायुषी झालीस, त्यामुळे तू पेरलेल्या सुसंस्कारांच्या 'शुद्ध बीजापोटी' आलेली 'फळे रसाळ गोमटी' दाखविण्याची संधी मला मिळाली नाही.
तुझी सेवा करून तुझे पांगही मला फेडता आले नाहीत.
माझी कविता–सुमने तुझ्या आत्म्याला सविनय समर्पण करणे एवढेच माझ्या हाती आहे.
ते मी मनःपूर्वक करीत आहे.

**२९ मार्च १९८३** **आप्पा**

# आत्मनिवेदन

विद्यार्थीदशेत असतानाच मला काव्यलेखनाचा छंद जडला व त्या काळी ‘मनोहर’ सारख्या लोकप्रिय मासिकातून माझ्या दोन कविता पहिल्या पानावर सचित्र छापून आल्या व इतर काही कवितांबाबत मान्यवर व्यक्तींकडून माझे अभिनंदनही झाले. माझ्याशी परिचित व्यक्तींना मी भावी आयुष्यात कवि म्हणून प्रसिद्धीस येईन असे वाटू लागले होते; परंतु अत्यंत प्रतिकूल परिस्थितीच्या भोवऱ्यात सापडल्यामुळे अल्पावधीतच माझे शिक्षण व काव्याचा व्यासंग सुटला आणि माझ्या काव्यप्रतिभेची स्थिती राजापूरच्या गंगेप्रमाणे झाली.

मराठी वाङ्मयातील काव्याला मागणी कमी असल्यामुळे अप्रसिद्ध कवींच्या काव्य–संग्रहासाठी प्रकाशक मिळणे अवघड जाते. त्यामुळे माझे लेखन पुस्तकरूपाने रसिकांपुढे आले नव्हते. माझ्या संग्रहातील काही कविता मराठी वाङ्मयात काही कालपर्यंत तरी टिकून राहातील असा मला विश्वास असल्याने व माझ्या पश्चात त्या प्रकाशात येतीलच अशी खात्री नसल्याने काव्यसंग्रह प्रसिद्ध करण्याची प्रबळ इच्छा मला काही महिन्यांपूर्वी झाली.

त्यानंतर माझे मामेभाऊ शाहीर वसंतराय नानिवडेकर ह्यांनी माझा काव्यसंग्रह चाळून अनुकूल अभिप्राय व्यक्त केल्यावर मी पुस्तक–प्रसिद्धीच्या कामास लागलो. मला साहाय्य करण्यासाठी श्री. वि. के. कानेटकर, श्री. सुधीर नाफडे, श्री. शामराव पळसुले, श्रीमती सुमित्रा पाटील इत्यादी आप्त पुढे सरसावले व त्याचे दृश्य फल म्हणून हा संग्रह–प्रसिद्धीचा योग येत आहे. ही सर्व मंडळी माझीच असल्याने त्यांचे आभार मानणे म्हणजे त्यांच्या भावना दुखावण्यासारखे असल्याने मी तसे करू इच्छित नाही.

ख्यातनाम साहित्यिक श्री. विद्याधर गोखले ह्यांनी आपली अनेक कामे बाजूला ठेवून माझ्या संग्रहाला प्रस्तावना लिहून दिली. ग्रंथाली वाचक चळवळीच्या संपादकांनी आणि कविवर्य जगदीश खेबूडकर ह्यांनी आपुलकीने अभिप्राय दिले. त्याचप्रमाणे कोल्हापूरचे प्रा. के. एच. ठक्कर ह्यांनी पुस्तक छपाईबाबत मार्गदर्शन केले. श्री. रामभाऊ खेर आणि ललित मुद्रणालयाचे श्री. मेघनाथ भगत ह्यांनी छपाईचे काम वेळेवर आणि नीटनेटके करून दिले त्याबद्दल मी त्या सर्वांचा ऋणी आहे.

– ज. स. कानेटकर

# अभिजात मोती

'देखें क्या गुजरे है कतरे पे गुहर होने तक !'

—गालिब

वास्तवाच्या विस्तवाचे ज्यांना फारसे चट्के बसलेच नाहीत, तेच महाभाग पुष्कळदा वास्तवतेची-इतकेच नव्हे तर अवास्तवतेची-पताका खांद्यावरून मिरवितात आणि उलट पक्षी ज्यांनी कठोर वास्तवतेशी मुकाबला केला आहे, ज्यांनी खडतर परिस्थितीची कटु फळे चाखली आहेत, गरिबीचे दुःख भोगले आहे असे कित्येक लेखक, सौंदर्यवादी साहित्याच्या कुंजात रमलेले दिसतात ! 'जे रम्य ते बघुनिया मज वेड लागे' ह्या वृत्तीने त्यांनी प्रसन्न निरोगी कविता लिहिली आहे. [आज पासष्टीच्या घरात असूनही तब्येतीने ठाकठीक असलेले श्री. ज. स. कानेटकर हे दुसऱ्या वर्गातील कवि होत.

पूर्वीच्या कोल्हापूर आणि सध्याच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कोकिसरे नामक खेड्यातला जन्म. त्यातही घरची गरिबी. त्यामुळे शिक्षणात खंड. वार लावून व लोकांच्या घरची कामे करून ह्या बुद्धिमान माणसाने मॅट्रिकपर्यंत मजल मारली. कोल्हापूरच्या 'विद्यापीठ' शाळेत श्री. का. धों. पेडणेकर ह्यांच्यासारखे भाषा–शिक्षक लाभले नसते, तर कानेटकरांच्या उपजत साहित्यिक वृत्तीला सत्काव्याची फुले आलीच नसती ! त्यांची बहुसंख्य कविता विद्यार्थीदशेत १९३७ ते १९३९ ह्या काळात निर्माण झाली, आणि पुढे शिक्षणाप्रमाणेच काव्यनिर्मितीतही मोठाच खंड पडला. १९३९ नंतर अडीच वर्षे बेकारीत काढून ते १९४१ च्या अखेरीस मध्य रेल्वेत कारकून म्हणून प्रवेशले आणि ७५ साली 'ऑफिस सुपरिंटेंडंट' (कार्यालय अधीक्षक) म्हणून निवृत्त झाले. तत्पूर्वीच आपल्या गावी विद्यालय स्थापण्याच्या कार्यात त्यांनी स्वतःला वाहून घेतले. त्यासाठी खूप कष्ट सोसले. ह्या साऱ्या खडतर मुसाफिरीत जरी काव्य–निर्मितीत अडथळे आले, तरी कविता–कामिनीच्या उपासनेत त्यांनी खंड पडू दिला नाही ! आता पुनश्च ते काव्य–लेखनाकडे वळले आहेत.

रेल्वे खात्यात कविजनांना न शोभेशा व्यवस्थितपणे नौकरी करीत असतानाही त्यांची 'नाइट शिफ्ट' मात्र काव्य–देवतेच्या मानकऱ्यांच्या सेवा–चाकरीतच व्यतीत होत आली ! तुकाराम, ज्ञानेश्वर, केशवसुत, बालकवि, भा. रा. तांबे, माधव ज्यूलियन, यशवंत इत्यादी कविवर्यांच्या काव्यात ते स्वत:ला विसरून जात–आणि आजही विसरून जातात !

## कुलीन कविता

ह्या अशा प्रथितयश कवींच्या संस्कारांनीच श्री. ज. स. कानेटकर ह्यांची कविता 'कुलीन' बनली आहे. भरपूर आर्थिक दारिद्र्य भोगूनही, त्यांची कविता दरिद्री–दीनवाणी नि कडवट झाली नाही, ती ह्याच कारणाने ! प्राय: १९३७ ते १९३९ या कालखंडातील ही कविता 'रवि–किरणां'नी उजळून निघावी आणि तिच्यात वैफल्याचे ऊरबडवे सूर नि अनिर्बंध उठवळपणा औषधालाही मिळू नये, हे स्वाभाविकच नव्हे काय ?......त्या पिढीत दिसणारी कुलीन लीनता त्यांच्या ठायी आजही आहे. आजच प्रसिद्ध होणाऱ्या त्यांच्या 'माती आणि मोतीं' ह्या काव्यसंग्रहाच्या 'रसिकास' ह्या पहिल्याच कवितेत ते म्हणतात, 'माझ्या काव्यमृत्तिकेमध्ये रसिकांना एक जरी सोन्याचा कण आढळला, तरी मी सार्थक मानीन !' 'विद्या विनयेन शोभते' असे मानणारा गृहस्थाश्रमी कवि आहे हा. नामकरणविधी, विवाहाचा मंगल सोहळा, बाळाची अंगाई, पत्नीचे त्यागमय प्रेम ह्यांत तो रमतो. तसेच राष्ट्र, राष्ट्रध्वज, आपले विद्यालय नि विद्यागुरु इत्यादी–विषयींचा कृतज्ञ प्रेमादर त्यांच्या काव्यातून ओथंबतो आणि वर म्हटल्या–प्रमाणे स्वत:चे कवित्व दबू न देता धारण केलेला अभिजात काव्याचा संस्कार ठायी ठायी प्रतिबिंबित होतो.

'आई म्हणोनि कोणी' आणि 'वात्सल्यसिंधु आई' ह्या दोन कविता ( अनुक्रमे यशवंत नि माधव ज्यूलियन ह्यांच्या ) त्या काळी खूप लोकप्रिय होत्या. कानेटकरांनीही तसाच मातृमहिमा गाइला आहे. ते आईला म्हणतात,

स्तुति खूप होत नित्य परि राम ना कशांत
पाठीवरून फिरवी तूं एकदाच हात ।

आईच्या प्रेमाप्रमाणेच सरळ साध्या शैलीची गोडी ह्या कवितेत आहे.

बालकवींची ( आणि सावरकरांचीही ) तारामंडळ–दर्शनाने बहरलेली कविता सुपरिचितच आहे. त्याच धर्तीची कानेटकरांची कविता देखील तारकांना पाहून विचारते,

इंद्र पाहतो सहस्र नेत्रें काय धरित्रीला ?
चंदाराणी खेळे किंवा कवड्यांच्या खेळा ?

ह्या कानेटकरांच्या कल्पना आहेतच. पण पुढील पंक्ती बालकवींचा गहिरा प्रभाव व्यक्त करतात. जेव्हा कानेटकर म्हणतात,

निशा नेसली काय खडीची काळी चंद्रकळा ?
...... नंदनवनि का पारिजातका बहर आज आला ?

तेव्हा मला बालकवींच्या

‘ नव टिकल्यांची चंद्रकळा कीं गगन श्री नेसे ?’

आणि

‘ कल्पतरूची फुलें उडालीं कीं वाऱ्यावरती ?’

ह्या ओळी आठवल्या.

त्यांची ‘ चिमण्या ’ वरील कविताही सहज सुबोध नि स्वाभाविक वर्णनाने सुंदर बनली आहे. पण त्याही कवितेवर बालकवींची शैली झकास तरळते. विशेषत:

घेती फिरक्या, मारिति गिरक्या
पटकन् येती भूवरती, टपकन् अन् दाणे टिपती !
टुणुटुणु मारिति सदा उड्या
पोरींच्या जणुं दोर–उड्या !
... ... असते जर मजला पंख
येतों तुमच्या कळपांत !

बालकवींच्या आत्म्यानेही ‘ बहोत खूब ’ म्हणावे अशी ही कविता ! पण तिला आजच्या वशिलेबाज क्रमिक पुस्तकांत स्थान मिळणार नाही, हे उघड आहे !

‘ **माझे कोडे** ’ ही कविता भा. रा. तांबे ह्यांच्या ‘ कुणी कोडे माझे उकलिल का ?’ ह्या कवितेवरून स्फुरलेली आहे, तर ‘ **भांडकुदळ** ’

व **'आंबोळीस'** ह्या कविता माधव ज्यूलियनांच्या विख्यात कवितांची विडंबने होत. 'ऐकव तव मधु बोल कोकिळे' ह्या माधव ज्यूलियनांच्या विख्यात कवितेचे **'आंबोळीस'** हे विडंबन आंबोळीइतकेच चविष्ट नि खमंग झाले आहे, असेच रसिकांचे मत पडेल ! **स्मरण आणि उत्कंठा**' हें केशवसुतांच्या कवितेवरील विडंबनही दर्जेदार नि चवदार उतरले आहे. ह्या कवितांतून त्या थोर कवींविषयी कुत्सितपणा नव्हे, तर आदरच व्यक्त होतो. ही विडंबन गीते कुणालाही दुखावत नाहीत, तर सर्वांना सुखावतात !

कवि ज. स. कानेटकरांची कविता प्रसन्न चेहऱ्याची असली, तरी त्या चेहऱ्यावर अनेकदा मजेदार मिश्किल स्मित छान झळकते. उदाहरणार्थ, **'टपालवाल्यास'** ह्या कवितेत, कोर्टाच्या नोटिसांनी हैराण झालेला माणूस म्हणतो,

लिहिशिल जर का 'निघून गेला येथुनि' हा शेरा
नोटिसांवरी, खाकी मित्रा ! होशिल मज प्यारा !
काम एवढे मजसाठी तू करशिल जर दोस्ता
करुनि दिवाळी देइन बघ तुज फराळ अन् पोस्ता !

सखीचे नेत्र वस्तुत: चुलीतल्या धुराने लाल झालेले नि साश्रु बनलेले. पण प्रियकरास वाटते की, ती रागावली आहे. म्हणून तो तिची खुशामद करतो. पण अखेर ती सखी हसून नी लाजून उद्गारते,

इश्य गडे ! काहि तरी काय बोलणें
... ... होत असे धूर फार दमट लाकडे !

अशी त्यांच्या रोमँटिक कवितेलाही नर्म विनोदाची झालर लगटली आहे. **'ढेकणाचे गर्वगीत'** ह्या विनोदी कवितेत 'कमले कमला शेते' ह्या सुभाषिताचा जो अनुवाद समाविष्ट केला आहे, तोही सुरेख आहे. त्यांच्या नर्म विनोदात क्वचित उर्दू शायरीचीही छटा डोकावते. उदाहरणार्थ,

'ले लो अपना बोसा वापस,
काहे को तकरार की ?'

ह्याच थाटात, विनासंमती अवचित चुंबन घेतल्यामुळे रागावलेल्या प्रियेस ते फर्मावतात —

समतेच्या ह्या युगांत सखये राहुं नको अबला
अन्यायाते साहुं नको मुळि, सत्वर घे बदला !
एका बदली तयार माझे हे दोन्ही गाल ......

'बाई एक द्या मज कुणि आणुनि'
'काम' पूर्ति जी करील माझी !'

ही 'एक तुतारी द्या मज आणुनि' वरून सुचलेली कविताही, विनोदाने ठीक खुलली आहे. **'जो सकलांस चकवी तोच कवी'** ही कोटि तर मला बेहद्द आवडली.

असा मिस्किल विनोदीपणा त्यांच्या काव्यात तरळत असला, तरी श्री. कानेटकर एकंदरीत गंभीर प्रकृतीचे सौंदर्यवादी कवि आहेत, हाच रसिकांचा अभिप्राय पडेल. ह्या दृष्टीने **'देऊळ आणि धर्मशाळा'** ही कविता उल्लेखनीय वाटते. धर्मशाळा अधिक लोकसेवा करूनही उद्ध्वस्त बनते आणि विशेष श्रम न घेणाऱ्या देवळावर मात्र वैभवाचा सुवर्णकलश चढतो हे पाहून कवि म्हणतो –

कार्यकर्ता होतसे हीन दीन
ऐतखाऊ भोगितो मात्र चैन !

जीर्ण रूढींना कवटाळणाऱ्या 'सनातन्याला' ते सुनावतात,

भगवद्‌गीता करिसि मुखोद्‌गत
'जुने टाकणे आत्म्याची गत'।
कथिसी लोकां, सर्व तुझी ती पोपटपंची काय ?

ज. स. कानेटकरांचा फडफडणारा **'भगवा झेंडा'** इतर अनेक ध्वज–काव्यांहून वेगळा आहे. तो म्हणतो,

स्वातंत्र्याचें पिउनी वारे अटकेवरि फिरलों
अटकेमाजी पडलों आतां म्हणुनी तडफडतों !

**'घडेका तिळ-गुळें क्रांति'** ही कविताही मनाला भिडणारे कटु सत्य सांगून जाते.

त्यांच्या प्रेम – कवितांना जसा मिस्किलपणाचा तसाच कल्पना–

विलासाचाही रम्य शिडकावा लागला आहे. 'प्रीतिची स्मृति' नि 'प्रीतिची महती' इत्यादी त्यांच्या कविता ह्या दृष्टीने पहाव्यात. त्यात सहजगत्या 'काळ विरहाचा, प्रीति-वर्धनाचा' अशी नेटकी सुभाषितेंही येऊन जातात.

श्री. ज. स. कानेटकर ह्यांची कविता 'सु-वृत्त' आहे, दु-र्वृत्त नव्हे ! अनेक अक्षर गण नि जाति-गणवृत्तात ते सहज कविता रचू शकतात. कधी

'मम ताप अतां विझवील चित्त रिझवील,
कोण भिजवील प्रीति पूराने ?
मजसाठि कोण झिजवील देह प्रेमाने ?'

असा लावणीबाज, तर 'छकुले कर बघु अंगाई' असे लोरी-गीत, कधी शार्दूल-विक्रीडित तर कधी अभंग असे नाना सुरेख 'छंद' तिला जडले आहेत.

असे अनेक गुण असले तरी श्री. ज. स. कानेटकर हे कवींच्या प्रथम श्रेणीत प्रवेशू शकले नाहीत ह्याचे मुख्य कारण भावनांची खोली नि कल्पनांची उंची अद्यापि कमी पडते, हेच होय. शिवाय कोठे 'काय' (शरीर) 'वी' (जन्म देणे) कोठे 'आवाहूं' (आवाहन करू) असे मोरोपंती शब्द-प्रयोग आणि कोठे कोठे

'बोल बोल जल्दि सारि टाकुनि भिती'
अथवा
'ठाऊके हे तुला आहे तरी का केलि मम शोभा'

अशा गद्यप्राय ओळी ह्या संग्रहात आढळनात.

तथापि आता वयाच्या ६५ व्या वर्षी, त्यांच्या काव्य-वेलीला दुसरा बहर आला आहे. त्यात ह्या उणीवा दूर होतील, आणि त्यांचा अभ्यास नि अनुभवसंपन्नता सुरेख काव्यरूप धारण करील अशी अपेक्षा आहे.

९-३-८३

**-विद्याधर गोखले**

# अनुक्रमणिका


| क्रमांक | शीर्षक | पृष्ठांक | क्रमांक | शीर्षक | पृष्ठांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | रसिकास | १ | २. | राष्ट्र उंच वाढवूं | २ |
| ३. | विद्यापीठास | ३ | ४. | गुरुवर्य नानांस | ५ |
| ५. | आई | ७ | ६. | टपालवाला | ९ |
| ७. | प्रीतीची स्मृति | १२ | ८. | प्रीतीची महती | १५ |
| ९. | नांदा सौख्यभरे | १७ | १०. | नवल–युद्ध | १८ |
| ११. | उमलत्या फुलास – | २० | १२. | मनोराज्य | २२ |
| १३. | जो जो रे बाळा | २६ | १४. | देऊळ आणि धर्मशाळा | २७ |
| १५. | पिंजऱ्यातील पोपट | ३० | १६. | विरह–वेदना | ३३ |
| १७. | तू चाल पुढे | ३६ | १८. | घडे का तिळगुळे क्रांती | ३९ |
| १९. | भगवा झेंडा | ४० | २०. | फूल ना फुलाची पाकळी | ४१ |
| २१. | सांग ना हें तरी आतां | ४२ | २२. | सनातन्यास | ४३ |
| २३. | चिमण्या | ४५ | २४. | आकाश ठेंगणे झाले | ४९ |
| २५. | साद आणि साथ | ५० | २६. | तारका | ५५ |
| २७. | छकुले कर बघु अंगाई | ५७ | २८. | माझे कोडे | ५८ |
| २९. | चकोरान्योक्ति | ६१ | ३०. | कावळ्याचे गाऱ्हाणे | ६२ |
| ३१. | एकच उपाय | ६४ | ३२. | अन्यायातें साहु नको मुळि | ६५ |
| ३३. | सखीस | ६६ | ३४. | दिवाळि आली | ६८ |
| ३५. | सवत आणिली तुला | ६९ | ३६. | टपालवाल्यास – | ७० |
| ३७. | स्वातंत्र्यवीराची पारतंत्र्यलालसा | ७२ | ३८. | उलटापालट | ७३ |
| ३९. | अजब कौशल्य | ७४ | ४०. | दारोदार | ७५ |
| ४१. | ढेकणाचे गर्वगीत | ७६ | ४२. | कवि–कल्पना | ८१ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४३. | स्मरण आणि उद्वेग | ८२ | ४४. | आंबोळीस | ८३ |
| ४५. | भांडकुदळ | ८४ | ४६. | मनी मांजरी | ८६ |
| ४७. | ट्रिंग ट्रिंग, ट्रिंग ट्रिंग, ट्रिंग ट्रिंग | ८८ | ४८. | देरे देवा सुरेख टक्कल | ८९ |
| ४९. | निघुनि ये सखी | ९१ | ५० | बाइ एक द्या मज कुणि आणुनि | ९४ |
| ५१. | दवडुं नको संधी | ९८ | | | |
| ५२. | संपादकास – | १०० | | | |


---

**अभिप्राय**

ह्या संग्रहातील काही कविता उत्तम आहेत ……

– ग्रंथाली संपादक मंडळ, मुंबई

## रसिकास -

काव्योदधिच्या विशाल डोही वाटे मज ही उडि घालू
बहुविध रत्नें प्रवाळ मोती असेचि काही वर काढू
हाती लागे तळात जें जें भरली ओंजळ त्याने मी
मर्दुमकीचा खास पुरावा दावाया ये तव धामीं ॥

रत्नपारखी तूच खरा रे, वेचुनि पाही किति मोती
किती पोवळी, शंख, शिंपले, किति कवड्या अन् किति माती
रत्नामाजी किती दुजांची, पैलू नसती कितिकांना
कितीक असती जुनी पुराणी, संप्रति भाव नसे ज्यांना ॥

मातीमाजीं कण सोन्याचा एक जरी तुज आढळला,
मानिन सार्थक एक कपर्दिक, शंख, शिंपला आवडला ॥

**मुंबई : नोव्हेंबर ८२**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.

# राष्ट्र उंच वाढवू

( कोल्हापूरच्या विद्यापीठ हायस्कूलसाठी वाटचाल गीत )

राष्ट्र उंच वाढवू त्याग सोसुनी ॥ धृ ॥

बनविणार हृदय शुद्ध
मन विशाल अन् प्रबुद्ध

निश्चय दृढ, कधि न ढळू त्याजपासुनी ॥ १ ॥

शक्ति-युक्ति एकजूट
प्रेम-भावना अतूट

योजुनि आनंद निर्मु, भूवरी झणी ॥ २ ॥

सांडुनिया लटकि लाज,
ध्येय एक लोक-काज,

आचरावयास निघू सज्ज होउनी ॥ ३ ॥

तुष्टण्यास रुष्ट माय
धष्टपुष्ट करुनि काय

इष्ट कार्य साधणार कष्ट घेउनी ॥ ४ ॥

कोल्हापूर : २-९-३८

# विद्यापीठास -

सदा पाहतो, बालकें जात विद्यालयी जों करायास विद्यार्जन
तदा सस्मृतींनी तुझ्या कंठ दाटे, भरे ऊर ओलावतीं लोचन
" किती छान होते, जरी सान होतो ! न होती कदापीहि ताटातुटी,
परी लागले पोट पाठीस आता " बने ह्या विचारे पुरा हिंपुटी ॥ १ ॥

मुखी चारुनी वारि चारा पिलांच्या करी पक्षिणी नित्य संवर्धन
तसे पाजिले ज्ञान, केलीस तूही पशूंची अम्हा माणसे पावन
इथे ' देवभक्ती तशी लोकसेवा ' महामंत्र ठावा अम्हां जाहला,
इथे बेत केले, ' करू राष्ट्रसेवा, डरू वा न हालां न हालाहला !'

सुपुत्रातुनी वारिले दैन्य कोणी तुझे अर्पुनीया तुला संपदा
तसे भूषवीले कुणी कीर्तिपुष्पे कुणी देह सेवेस वा वाहिला
कुठे ते हिरे ? मी कुठे गारगोटी ? वृथा वाटते कष्टवीले तुला
करंटा असे मी नसे पूजनाला, तसे काहिही दिव्य तूझ्या पदां !

असो मी कसाही मला लाज नाही वदाया कधीही तुला ' माउली '
अपेक्षूनि काही उपेक्षील का गे कराया कृपेची सदा साउली !
अपेक्षा उपेक्षा कशी संभवे ती ? करी का कधी अंधकारा रवी ?
अहा वत्सले, ज्या तुला ना तुला, ना कदा ती वृथा मर्त्य दोषांस वी !

तुझे ध्यान ध्यावे, तुझे गान गावे सदा आइकावें तुझे कीर्तन,
असे हीच इच्छा, प्रकाशूनि तेजे कदापी बनावे तुझे भूषण,
पहाया स्वरूपा नि रौप्योत्सवाला मला होय दुर्लंघ्य अल्पान्तर
शुभेच्छा तथापी निवेदीत माझी ' सुखे वैभवे नांद कल्पांतर ! '

**मुंबई : ऑगस्ट १९४२**

## गुरुवर्य नानांस –

( कोल्हापूरच्या विद्यापीठ हायस्कूलचे त्या काळातील मुख्याध्यापक श्री. कृष्णाजी रामचंद्र ऊर्फ नाना कुलकर्णी हे एक सच्चे गांधीवादी, ध्येयवादी आणि कनवाळू गृहस्थ होते. विशेषत: गरीब पण हुषार विद्यार्थ्यांसाठी ते फार झटत असत. दुर्दैवाने त्यांना अकाली मृत्यू आला. त्यांच्या मृत्यूची वार्ता कळल्यावर ही कविता स्फुरली. )

धन्य राष्ट्रवीरा, धन्य कृतिशूरा
चरणी मुजरा, असो माझा ।

धन्य तुझे शील, धन्य केले कुल
जगा भूषवील, नाव तुझे ।।

तीव्र देशभक्ति, उच्च ध्येयासक्ति
वेचिलीस शक्ति, त्यांच्या ठायी ।।

कायिक वाचिक, आणि मानसिक
चंदनाचे पीक, झिजविले ।।

प्रगल्भ विचार, विशुद्ध आचार
नेमस्त उच्चार, होता तुझा ।।

कर्तव्य पालन, हेच मान-धन
नावडे चिंतन, आणिकांचे ।।

उदार अंतर, झटे निरंतर
व्हावया आधार, अनाथांना ।।

'नको हो नखरा, सुगंध विखरा'
संदेश हा खरा, दिला तूच ।।

कशाला रडणे, झाले तुझे सोने ।
मरूनी जगणे, पुरूषार्थ ।।

लोपुदे आकृति, जिवंत ही कृति
देत राही स्फूर्ति, कर्तव्याची ।।

मानस-मंदिर, घडिले सुंदर
शोभते गंभीर, मूर्ति तुझी ।।

वाहुनी सुमन, करिन पूजन
गाइन भजन, आवडीने ।।

मुंबई : १०-१२-१९४०

# आई

नाही प्रमाद केला, आई तुझा कधी गे
गेलीस स्वर्गलोकी कां टाकुनी मला गे ?
' आई ' म्हणोनि आता कोणास मी बहावे ?
दुःखास अंतरीच्या आणी कसे सहावे ?

आईत सौख्य जें का अन्यत्र आढळेना
शब्दात वर्णवेना, स्वर्गातही मिळेना
आईविना असे तें मज शुष्क सर्व काही
देईल कोणि आई, देणार काय नाही ?

खाण्यास रोज मजला स्वादिष्ट अन्नरास
परि भूक नाहि शांत, दे एक प्रेमघास
स्तुति खूप होत नित्य परि राम ना कशात
पाठीवरूनि फिरवी तू एकदाच हात

माते तव कृपेने अजि वैभवी नहातो
लाभे तशी प्रतिष्ठा, परि खेद ना कमी तो
आई मला न उरली भाग्यास या बघाया
आनंदि भाग घ्यावा, कौतूक ते कराया

विसरेन आर्यधर्मा, विसरेन मायदेशा
विसरेन पूर्वजांना, विसरेन त्या सुरेशा
विसरेन ना परी मी, आई तुला कधीही
बुद्धीत जों विशुद्धी, देहात जीव राही ।।

मुंबई : १९६३

## टपालवाला

वाटित पत्रे घरोघरी
रोज फिरे हा कोण तरी ?
करीं पुस्तकें घे मोठी
पत्रपेटिका का खोटी
फेटयाचा दिसतो झोक
कानावरि खोवी टाक
वेष सर्व करितो खाकी
घरोघरी पत्रे टाको ॥१॥

यास नसे थंडी ऊन
यास नाहि भूक-तहान
नेम चुकेना कधि काळी
म्हणे न दसरा दिपवाळी
सुट्टी ना ठावी याला
आळस ना करि कामाला
असो नसो कुणि नात्याचे
काम करी ज्याचे त्याचे ॥२॥

दूर न जरि कोठे जात
सर्व जगाची दे बात
सकल जनांचा विश्वास
संपादन करितो खास
इतरां जेथे प्रतिबंध
ह्याला ना कधि निर्बंध
प्रिया प्रियकरांचा दूत
प्रेमिजनांचा मध्यस्थ ॥३॥

जवळी द्रव्याची थैली
वृत्ति होइना बदफैली
रोज वाटितो खूप धना
दानशूर परि म्हणवीना
उदार हा आहे ऐसा
स्वये येइ देई पैसा
कधी न हा काही मागे
देता कुणि, होई मागे ॥४॥

लोक बैसले गमतीत
   तार आणितो अवचीत
रडवी सर्वांना धाय
   परि ना त्याचे मन खाय
कधी येउनी हर्षवितो
   परी दिसेना तो हसतो
चळे न कधि वृत्ती धीर
   सदा सर्वदा गंभीर      ।।५।।

दैव कसे खेळे खेळ
   दावी जणु वेळोवेळ
कुणास हसवी रडवि कुणा
   सुखदु:खाची बाधा ना
नियमित अति हा रवीपरी
   योग्यासम अन् अविकारी
नसे मनुज हा, परि माते
   यंत्रचि अद्भुत हे गमते ।।६।।

कोल्हापूर : १५-७-१९३८

# प्रीतीची स्मृति

दिवस गेला संध्येस भेटण्याला,
वाट पाही उपवनी एक बाला,
युवक आला शोधीत तियेलागी
परी गंभिरता दिसे मुखोभागी ॥१॥

" नाथ अजला का उशिर फार केला ?
दिसत नाही मुखि रोजचा तजेला
किती गंभिरता मुग्धताहि आली
स्फुरति बाहू अन् घर्मबिंदु भाळीं " ॥२॥

वदे बाला हस्तांस ठेवुनीया
स्कंधिं त्याच्या अन् दृष्टि रोखुनीया,
मान वळवी लडिवाळपणें जेव्हा
काव्य वाटे हासते तया तेव्हा ॥३॥

करीं धरुनी हस्तांस तिच्या बोले
जवळि ओढी, परि नेत्र पहा ओले !
" सखे जावे लागते मला आता
देशकार्यी सोडुनी तुझ्या हातां ॥४॥

मला जाचे कल्पना वियोगाची
परी दिधले सर्वस्व देशकाजी
प्रेम-कर्तव्यी विजय दुसऱ्याचा
काल विरहाचा प्रीतिवर्धनाचा ॥५॥

रवी जातो सोडुनी पश्चिमेला
शशी फिरतो टाकुनी रोहिणीला
तुटत संबंधहि दिवस यामिनीचा
पहा कर्तव्यी श्रेष्ठपणा साचा ॥६॥

जरी जाइन मी दूरच्या प्रदेशी
परी राही चित्त ते तुझ्यापाशी
भेट घेईन सत्वरी शक्य जेव्हा
निरोपी मज ठेवून पूर्वप्रेमा " ॥७॥

गहिवरोनी कल्पने वियोगाच्या
अश्रुबिंदू पातले, रुद्ध-कंठा
म्हणे, " काहीतरि प्रेमखूण द्यावी
मला, माझी तैशीहि स्वीकरावी " ॥८॥

बालिकेने गुंफिली पुष्पमाला
कंठि घालुनि भूषवी वल्लभाला
केशसंभारी फूल गुलाबाचे
तिच्या खोवुनि मग फिरवि पावलांते ॥९॥

वळुनि देखे तो परोपरी मागे
पदहि त्याचे ना पडे पुढे वेगे
रमणि पाही परि एकदृष्टि त्यांते
असे जोवरि तो दृष्टिच्या पथाते ॥१०॥

काळ लोटे मग रूप गंध गेला
फुलांचा त्या लोपलाही तजेला
सुकुनि त्याचा निर्माल्य बने आजी
परी प्रीतीची स्मृती मात्र ताजी ॥११॥

**कोल्हापूर : १६-८-३७**

## प्रीतीची महती

जवळी येउन दृढ आलिंगन, देइ मला झडकरी
राहवे तुजला कैसे दुरी ? ॥ धृ ॥

बघ कशी तरूला लता मिठी [redacted] घालते
भेटण्या सागरा सरिता द्रुत धावते
जललहर पहा ती काठा कशि चुंबिते
धावुनि यावे, मज बिलगावे, वाटेना तुज परी
कळेना काय तुझ्या अंतरी ! ॥ १ ॥

की चंद्र येतसे भेटाया तारके,
की पवन फुलवितो कलिके घेउनी मुके
वाटते तुला का तैसेची प्रिय सखे
मीच येउनी फुलवावी तव ओठाची पाकळी
गोजिरी गालींची अन् खळी ? ॥ २ ॥

सोडना मुग्धता पुरे तुझी मस्करी
बोलना एकदा स्पष्ट काय ते तरी
राहवे मला ना दूर अता क्षणभरी
चार पावले अंतर भासे चार योजने पुरी
महति ही प्रीतीची सुंदरी ॥ ३ ॥

होउदे एकदा ह्रदयांचे मीलन
शमवुया तयांचे केव्हाचे स्पंदन
किति वेळ पाळिशी लज्जेचे बंधन
आकाशी त्या पहा तारका डोळे मिचकाविती
लाजण्या तुझ्या खुदू हासती ! ॥ ४ ॥

**नवलिहाळ : ७-५-३८**

# नांदा सौख्यभरें

वाद्ये मंगल, पातली सुचविती वेला मनोवांछित.
हा अंतःपटही फिटोनि, सुमने होती अता गुंफित ।
' साधावे पुरुषार्थ एकवटुनी, संसारिं द्या दक्षता
व्हाया पूरक, एकमेक ' कथिती तुम्हां सुमंत्राक्षता ॥

आता सावध टाकिता पद पुढे ये हा गृहस्थाश्रम
झालां सूज्ञ सुशील येथुनि करा तेजाळ आयुःक्रम
विद्येला विनये, मुखा मधुवचे, दानें करा भूषवा,
भाषा-संस्कृति-राष्ट्र-धर्म कृतिने ह्यां पोचवा वैभवा ।

नांदा सौख्यभरे, निरामय तसे दीर्घायु लाभो तुम्हां
लक्ष्मी सुस्थिर फाकु दे सुयशभा, प्रेमादरा पात्र व्हा
बाळें दोन सुलक्षणी बहुगुणी खेळोत अंकावरी
श्रीविघ्नांतक संहरोनि दुरितें कुर्यात् सदा मंगलम् ॥

मुंबई : १९४२

# नवल युद्ध

अद्‌भुत ना युद्ध असे जाहले कधीही ॥ धृ ॥

गुप्त कोण मारि कुणा,
कां लढती समजेना

अविरत परि समर मात्र, खंड ना जराही ॥ १ ॥

कृष्ण-ढगांच्या ढाली
चपलांच्या तलवारी

खणखणाट तीक्ष्ण, विश्वकर्ण बधिर होई ॥ २ ॥

इंद्र घेत चाप करीं
अखिरि शरवृष्टि करी

परि अरीस द्याया मुख, धैर्य नसे त्याही ॥ ३ ॥

बहु भीषण रण चाले
रक्त-जलें नद नाले

वाहति, पाहूनि त्यास रडति दिशा दाही ॥ ४ ॥

वायूला कंप सुटे
सूर्य लपे भिउनि कुठे

घाबरोनि पळता भुइ थोडि जला होई ॥ ५ ॥

' युद्ध करी प्राण नाश
बेचिराख भू-प्रदेश '

नवल परी रण दे हे विभव सौख्यदायी ॥ ६ ॥

कोल्हापूर : २१-७-१९३८

# उमलत्या फुलास-

( पूर्वार्ध )

उमलत्या फुला,
सांग मला, तुज कसला मोद जाहला ? ॥ १ ॥

वदनि मधु वसे
तोंवरीच मधुपवृंद आदरे पुसे ॥ २ ॥

वर्ण रंगला
तोंवरीच रमणिशिरी स्थान बघ तुला ॥ ३ ॥

गंध दरवळे
तोंवरीच रसिकचित्त तुजकडे वळे ॥ ४ ॥

विभव लोपले,
समज तोंच पदतळिं तुज कुणिहि चिरडिले ॥ ५ ॥

कोल्हापूर : ११-६-३८

# फुलाचे मनोगत

( उत्तरार्ध )

सुमन जन्मले
अमित योनिमाजि परम भाग्य मानिले ॥ १ ॥

दैवि लाभले
विभव परहितार्थ वेचि, सौख्य लाधले ॥ २ ॥

अन्य जीवनी
अल्प तोष देउ शके, तुष्ट मी मनी ॥ ३ ॥

धन्य ते जिणे
योजि सकळगुणविशेष, ठेवि ना उणे ॥ ४ ॥

मर्त्य जीवनी
व्यर्थ शोक करुनि काय साधले कुणी ? ॥ ५ ॥

मुंबई : १८-११-८२

# मनोराज्य

जगती ऐसे राज्य नसे, सुख सर्वस्वी ज्यात वसे
बहुत ठिकाणी
येती निशिदिनि
अनुभव कटु अति दु:खाचे, रावां-रंकां एकचि ते ॥ १ ॥

एक पीडिला रोगाने, दुजा त्रासला अपमाने
कुणा न संतति
कुणा विपत्ती
कुणा कामिनी बाधतसे, कुणी कशाने वेडपिसे ॥ २ ॥

अपूर्णता चिर नांदतसे, सुख भासे जणु मृगजलसे
चिंता राक्षसि
नित्य पाठिशी
क्षणोक्षणी करिते वार, सुटके न दिसे आधार ॥ ३ ॥

मिळे एक परि मनुजा या अमोल ठेवा भोगाया
राज्य मनाचे
सदा तयाचे
वाहे जेथे सुख-वारा, चिंतेला नच लव थारा ॥ ४ ॥

तरू वाकले मधुरफळें, लता डोलती गंधि फुलें
असल्या बागा
व्यापिति जागा
मध्यें पुष्करिणी खुलती, सुवर्ण-कमळे फुलताती ॥ ५ ॥

पक्षीवर तेथिल सारे, उभारिती मोर-पिसारे,
कंठ किरांचा
त्यांना साचा
हंस गतीने जाताती, कोकिळ-कूजित गाताती ॥ ६ ॥

भूमी खुलली हिरवळिने, बागडती त्यावर हरणे
इंद्रचाप तो
नित्य विलसतो
चंद्र प्रकाशे आकाशी, अवसेच्याही अंधनिशी ॥ ७ ॥

वसंत रमतो वर्णभरी, शीतलवायू श्रमहारी
चंड उन्हाळा
तीव्र हिवाळा
यांचा नाही कधि त्रास, होतो नंदनवन भास ॥ ८ ॥

नक्षत्रांचे दीप तिथे, रत्नांचा पाऊस तिथे
सर्वहि काळी
हसे दिवाळी
नसे कुणाला क्षुधा-तृषा, अपूर्ण कसली नच वांछा ॥ ९ ॥

रम्य नगरिची त्या रचना, लोक बोलती सुवचांना
सर्वहि ललना
सरोजवदना
अर्पिति जीवन वीरांना, देशाच्या आधारांना ॥ १० ॥

समता तेथे नांदतसे, पारतंत्र्य ठाऊक नसे,
उल्हासाचे
अती मजेचे
शांति-सुखाचे घर जाणा, आनंदा त्या ना तुलना ॥ ११ ॥

राज्य असे हे मिळवाया, नलगे तनमन झिजवाया
प्रत्येकाचे
हे हक्काचे
मिळे नृपत्वहि त्या खास, न परि नृपाचे आयास ॥ १२ ॥

मनोराज्य करण्यासाठी मनुज करी आटोकाटी
ताप सोसण्या
दुःख भोगण्या
कुणी न असता मग राजी, जरि ना तें हातामाजी ॥ १३ ॥

मुंबई : १९४३

# जो जो रे बाळा

शुभ दिन शोधुनि घाली बाळा पाळण्यात आई
सुवेळ साधायाची सकलां होत पहा घाई ॥१॥

रेखुनि काजळ नयनिं, लाविली तीट उभय गालां
विघ्ननिवारक कुंकुम टिकला खुलवितसे भाला ॥२॥

घालुनि उंची वस्त्रभूषणें शोभविले बाळा
पालकही सजविला गुंफुनी गंध-सुमन माळा ॥३॥

कौसल्येचा राम काय हा, देवकिचा कान्हा ?
जिजाइचा की शिवबा अथवा - - - चा तान्हा ? ॥४॥

सुवासिनींनो, कुमारिकांनो, स्वकियांनो या या
या आप्तांनो ह्या छकुल्याला आशीर्वच द्याया ॥५॥

म्हणा कुणी ' घ्या गोविंदाला, गोपाळा ' कोणी
कुणि हलवा हा हळुच पाळणा, म्हणा कुणी गाणी ॥६॥

भरल्या ओटया सुवासिनींनी नारळवस्त्राने
आनंदोत्सव करिति साजरा प्रमुदित चित्ताने ॥७॥

उदंड आयु-प्रज्ञा-प्रतिभा लाभो मम बाळा
प्रार्थित आई वदता वदता जो जो रे बाळा ॥८॥

कोल्हापूर : १७-५-७७

# देऊळ आणि धर्मशाळा

तेथ मंदिर शोभते शंकराचे
गगनभेदी ज्या कळस कांचनाचे
येथ पडकी उध्वस्त धर्मशाळा
दिसे होते शेवटी भक्ष्य काळा ! ॥१॥

असे दोघांची एक जन्मवेळ
परी स्थितिला अजि नसे मुळी मेळ
एक भिडते प्रौढीत अंबराला
शरण येई दुःखात दुजी भूला ॥२॥

कितिक यात्रेकरु आणि पथिक येती
आश्रयाला राहती हिच्या, जाती
कुणी अर्पिति देवास रत्नमाळा
कुणी बांधिति त्यापुढे दीपमाळा ॥३॥

देव होई श्रीमंत दिसंदीस
दिवस सौख्याचे येत पुजाऱ्यास
धर्मशाळा पावते इथे भंग
कुणी नाही फेडावयास पांग ॥४॥

कष्ट करितो शेतात क्षेत्रगामी
भूक शमते ना, पीक अन्य धामीं
जनां तैशी नित देत आसरा ही
परी अपुरी उद्धार-आस राही ॥५॥

धर्मशाळा, मंदीर मला साचे
दावितातो प्रतिबिंब समाजाचे
कार्यकर्ता होतसे हीन-दीन
ऐतखाऊ भोगितो मात्र चैन ॥६॥

' देव केवळ का वसे देवळात ?
गोडि वाटे त्यासही का धनात ? '
वेळ कोणा करण्यास विचारा ह्या
बरी रूढी वाटते आचराया ॥७॥

तेथ दगडाची मूर्ति एक राही
मंदिराची मुळि गरज जिला नाही
जेथ पाकोळ्या आणि पुजारी तो
विना ह्यांच्या ना लाभ कुणा होतो ॥८॥

खुली सर्वां राहते धर्मशाळा
मना वाटे ही खरी धर्म-शाळा
कुणा नाही मज्जाव कधी येथे
प्राणिमात्रां सारखी तोषवीते ॥९॥

नको मंदिर, पाहिजे धर्मशाळा,
गरज वाटे हिचि फार समाजाला
जनार्दन ना जनतेस सोडुनीया
मूर्तिपूजा जातसे सर्व वाया ॥१०॥

**नवलिहाळ : ९-५-३८**

## पिंजऱ्यांतील पोपट

कशास करिशी यत्न सारखा पंजर सोडावया
शुकवरा बाहेरी जावया ? ॥ ध्रु ॥

कां नच रमते तव मन येथे, हेतु न तव मज कळे
सुख तुला येथ काय ना मिळे ?
धनी मिळाला धनिक तुला तो तसाच हौशी अती
करितसे प्रीति तुझ्यावर किती !
सुवर्ण-पंजर दिधला सुंदर रहावयाला सुखे
तयाने तुजला बहु कौतुके
नित मिळे चाखण्या तुला मिठाई बरी
मधु तसाचि मेवा, सुपक्व-फलमाधुरी
कधि मिळे न अन्या जन्महि खपता जरी
दिसेना तरी खुषी, संधि परि उत्सुक शोधावया
शुकवरा बाहेरी जावया ॥ १ ॥

स्वतंत्र सेवक तये ठेविला देत तया भाकरी
निशिदिनी करण्या तव चाकरी
सुभाषितेही तुजसि पढवितो अनेक सुदर अती
मधुर तव कंठी जीं शोभती
अलंकार तव पदीं घातले रुणुझुणु जे वाजती

पाउले यदा तुझी हालती
करि धनी चौकशी तुझीच सर्वाअधी
परि वृत्ति हासरी आढळे न तव कधी
सुख काय वाटते रान-कोटरामधी ?
म्हणुनी करिशी यत्न सारखा पंजर सोडावया
शुकवरा बाहेरी जावया ? ॥ २ ॥

**पोपटाचे उत्तर**

प्रयत्न करितो परदास्याचे बंधन तोडावया
कळोनी प्रश्न व्यर्थ कासया ? ॥ धृ ॥

स्वातंत्र्याची द्याया गोडी पूर्वी ज्या सापडे
मजपरी असाच तो धडपडे
तुला वाटतो सुवर्ण-पञ्जर, कारागृह मम परी
धनी तो नसे दुजा तर अरी
कनक-भूषणे नादति मंजुळ भासतसे जरि तुला
खळखळा वाजति मम शृंखला
मम पोपटपंची करित तयाला खुषी
परि तिने पाडिले मला खरोखर फशी
स्वातंत्र्य-आस पोपटा, तुम्हाला जशी

संधि पाहतो स्वतंत्र होउनि भरारि मारावया
कळोनी प्रश्न व्यर्थ कासया ? ॥ ३ ॥

स्वजनसंगती नांदत होतो सुखे विहरलो किती !
श्रमांची कधि न वाटली क्षिती
स्वैर भराऱ्या नीलाकाशी अफाट किति मारिल्या
हाय ! परि स्मृती अता राहिल्या
कष्टाचा तो दाणागोटा खाता सुख ते अहा !
आयता मेवा मज तुच्छ हा !
जों असे स्मृती ही हृदयी तों चडफड
कोठली शांति, परि पंखांची फडफड
ते सौख्य मिळाया ही सारी धडपड
स्वातंत्र्याचे जीवन केवळ सौख्यद भोगावया
कळोनी प्रश्न व्यर्थ कासया ? ॥ ४ ॥

कोल्हापूर : १३-१०-३७

# विरह-वेदना

मम प्रिया
अता ती दुरी
राहिली घरी
तिखट उरि सुरी
झोंबते हीच,
परि परिस्थिती आसुरी, दया नाहीच ! ॥१॥

मज अता
घेउनी कुशी
भुजाची उशी
देत, चौकशी
कोण करणार ?
नाकळे वेळ ही अशी कधी सरणार ! ॥२॥

मज अता
स्मिते खुलवील
वचे झुलवील
कोण फुलवील
करस्पर्शानें
मज अता कोण भुलवील आपुल्या नयने ? ॥३॥

मम अता
    ताप विझवील
        चित्त रिझवील
            कोण भिजवील
                प्रीतिपूराने ?
मजसाठि कोण झिजवील देह प्रेमाने ? ॥४॥

मज अता
    क्षणिक रुसवील
        अणिक हसवील,
            नजिक बसवील
                कोण लाडाने ?
मम हृदयि कोण ठसवील मधु मधू वचने ? ॥५॥

मी अता
    कुणाशी बसू
        कुणाशी हसू
            कुणाला पुसू
                भाव हृदयीचे ?
वद सखे, कुणाच्या पुसू आसु नयनीचे ? ॥६॥

मनि अता
सतत हुरहूर
उठे काहूर
दाटला ऊर
विरह-दुःखाने,
कधि शमे मदन हा क्रूर, अधर-मधुपाने ? ॥७॥

मी अता
कुठेतरि जाउ
विरह किति साहु
वाट किति पाहु
तुझ्या भेटीची ?
वद सखे, कुणाला बाहु हाक प्रीतीची ? ॥८॥

छे नको
नको ती प्रीति
वाटते भीति
बिकट ही रीति
विरह ये वाटे
तो गुलाब राहि न हाति, बोचती काटे ! ॥९॥

मुंबई : १९४२

## तू चाल पुढे

ठरु नको नरा तू चाल पुढे
बघु नको मुळी इकडे तिकडे ॥ ध्रु ॥

तृषार्त नेत्रां दिसे दूरवर
शीतल सलिले पूर्ण सरोवर
मृगजल परि ते उमज खरोखर
फसु नको तया तू चाल पुढे
बघु नको मुळी इकडे तिकडे ॥ १ ॥

थकल्या जीवा करण्या राजी
वाट पाहते ही तरुराजी
घेउनि सुफले पिकली ताजी
रमु नको येथही चाल पुढे
बघु नको मुळी इकडे तिकडे ॥ २ ॥

कोठे चाले कोकिलकूजित
कोठे वायू मंद सुगंधित
मोहक ऐशी स्थाने अगणित
भुलु नको तया तू चाल पुढे
बघु नको मुळी इकडे तिकडे ॥ ३ ॥

सूर्य कोपला नसे निवारा,
लपुनी पुरता बसला वारा,
घामाच्या जरि धावति धारा,
चळु नको तरीही चाल पुढे
बघु नको मुळी इकडे तिकडे ॥ ४ ॥

पर्वत दुर्गम, पथ कण्टकमय,
हिंस्र श्वापदे, भुजगांचे भय
सोबति नच वा बसावया हय,
डरु नको तरीही चाल पुढे
बघु नको मुळी इकडे तिकडे ॥५॥

ध्येय-सिद्धिचा मार्ग बिकट अति
कुंठित करितो क्षणोक्षणी गति
मर्द कशाचा, बाळगि जो क्षिति ?
धरि धीर आणि तूं चाल पुढे
बघु नको मुळी इकडे तिकडे ॥६॥

कशास काळिज धडके धडधड ?
जोमाने तू चालवि धडपड
सुगमहि होइल चढ मग अवघड
यश कीर्ति सत्य सुख त्यात पुढे
बघु नको मुळी इकडे तिकडे ॥ ७ ॥

कच खाउनि जो मधींच बसला
सर्वस्वाला पुरता फसला
परि खंबिर तो सदैव हसला
स्मरुनिया एवढे चाल पुढे
बघु नको मुळी इकडे तिकडे ॥ ८ ॥

**कोल्हापूर : १-११-३८**

# घडे का तिळगुळे क्रांती

( कवि विपन्नावस्थेत असतांना त्याला आप्तस्वकीयांकडून प्रेमाची वागणूक मिळत नव्हतां, म्हणून ही कविता सुचली. )

लाडके, खपुनि दिनरात सुकोमल झिजवुनी हात
बनविला मधुर हा हलवा, मन-मधू ओतुनी त्यांत

‘ जाहला शुभ्र नाजुक ना ? पहावा,’ पुसशि तू लाडे
‘ पाठवूं परि कुठें ? कोणा ?’ मजपुढें केवढें कोडे !

कुणाला थोरवी त्याची कटुवचे करुनि उपहास
बोलतिल चार दाण्यांनी कृपणता व्यक्त हो खास !

कुशलता, शुभ्रता फोल — तयांना बोचतिल काटे
वदोनी ‘ कृष्णहृदयी हा,’ फेकतिल भय मना वाटे

विसरुनी पूर्व छळणूक, जाशि तू गोड वागाया,
जगाला प्रेम पैशाचे, कुणी ना गोडवा गाया

असे ही विपरिता वेला, मनाला पडु न दे भ्रांती
शक्य ना आत्महोमे जी, घडे का तिळगुळे क्रांती ?

मुंबई १९४४

# भगवा झेंडा

('भगवा झेंडा फडफडतो' ह्या शीर्षकाची एका कवीची कविता वाचून ही कविता स्फुरली आहे. लेखनकाल स्वातंत्र्यप्राप्तिपूर्वीचा आहे.)

सतत मनीं कुढतो,
परि मज म्हणती ' फडफडतो ' ॥ ध्रु ॥
स्वातंत्र्याचे पिउनी वारे अटकेवरि फिरलो,
अटकेमाजी पडलो आता म्हणुनी तडफडतो, परि० ॥ १ ॥
विरक्तिची मी जरी निशाणी समर्थ - शिवबांची
खुशाल चाले विलास येथे म्हणुनी चडफडतो, परि० ॥ २ ॥
एक शिवाजी, मुरार, बाजी, एकचि तानाजी
पुन्हा न झाले ते रणगाजी म्हणुनी मी रडतो, परि० ॥ ३ ॥
गाउनि कीर्ती त्या वडिलांची त्याना लाजविती
नामर्दाई लपवू बघती म्हणुनी मी चिडतो, परि० ॥ ४ ॥
फूल वेचले तेथ गोवरी वेचण्यास लागे,
ताप मला तो असह्य होतो, अंतरात कढतो, परि० ॥ ५ ॥
पारतंत्र्य हिव बाधतसे, मज सोसवे न आता
स्वातंत्र्याचा सूर्य उदेना, म्हणुनी कुडकुडतो, परि० ॥ ६ ॥
जीव निघाला तरि ना आशा सोडितसे पाठ,
दिवस सुखाचे, स्वातंत्र्याचे बघण्या धडपडतो, परि० ॥ ७ ॥

कोल्हापूर : १९३८

# फूल ना फुलाची पाकळी

तू धनीण माझी, मीहि तुझा गे माळी
चल तुला दावितो बाग फुलविली सगळी
ही प्रफुल्ल कमळे निळी निळी नयनांत
बघ जणू शोभती शुक्र गुरू गगनात
हे गहिरे गहिरे गुलाब फुलले गाली
मांगल्य अवतरे वाटे पाहुनि लाली
नच काळे कुरळे कुंतल हलती डुलती
तृण-गालिचाच हा डोळे खुलती भुलती
ही नसे नासिका, सोनफुलाची कलिका
उमलता उमलता विखरित जाय सुगंधा
हे जपुनि ठेविले कुदकळ्यांचे गजरे
पेटीत मुखाच्या, दिसति काय तव नजरे ?
केवढा केवडा त्यात शोभतो सांग !
हा रंग गुलाबी अभिनव नाही का ग ?
ह्या नव्हत गालिंच्या खळ्या – फुलांचे देठ –
पाकळ्या तयांच्या गळल्या – कुठले ओठ.

घे फुले हवीतर हार आणि ती कलिका
फूल ना फुलाची पाकळि तरि देशिल का ?

**कोकिसरे : १५–६–३९**

# सांगना हे तरी आता !

नसे हा दोष जरि माझा तरी कां ही मला शिक्षा ?
सांग तू न्यायदृष्टीने एवढी मागतो भिक्षा ॥ ध्रु ॥

देखुनी पूर्ण चंद्राला सागरा येतसे भरती
चुकी का वाटते तुजला ह्यामधे सागराची ती ? ।
नलिनिच्या पाहुनी रूपा मोहुनी आणि मधुगंधा
मधुप तो बिलगतो तिजला ह्यांतही दोष कोणाचा ? ॥
दावण्या पातलो येथे तव छबी हृदय-देव्हारी
परी तू नेणुनी मजला घातला घाव जिव्हारी ॥
मोल ते पारखायाला गुणांचे रसिकची युक्त
विचारी कोण देवाला जरी ना जाणता भक्त ? ॥
कोंदणावाचुनी नाही हिऱ्याला अल्पही शोभा
ठाउके हे तुला आहे, तरी का केलि मम शोभा ? ॥

कितीसे सौख्य तुज लाधे जाळिता हृदय मम खाक ?
सांगना हे तरी आता एवढी घाल तू भीक !

कोल्हापूर : ११-९-३७

## सनातन्यास-

वृद्धा, रूढिस कुणी पुसेना म्हणुनि घेशि का हाय् ? ॥ ध्रु ॥

वस्त्र जाहले जुनेपुराणे
टाकुनि, दुसरे नवीन लेणे

रीति योग्य ही, ह्यांत वाटतो काय तुला अन्याय् ? ॥ १ ॥

आज तरुवरी पल्लव सुंदर
पाचोळा परि बनतो नंतर

संपुन यौवन, आज जाहली जरठ तुझी ही काय् ! ॥ २ ॥

दीपापासुनि निघत काजळी
होत दिनाची रजनी काळी

निरभ्र अंबर साभ्र होतसे, हाच सृष्टिचा न्याय् ॥ ३ ॥

बदल होतसे जगति निरंतर
चालीरीतिंत पडते अंतर

कळुनि वळेना कसे तुला, तव अक्कल कोठे जाय् ? ॥ ४ ॥

जरा कुणाला नाही चुकली
रूढी त्यातुन चुकेल कुठली

वृथा मात्र तू दुःखित होशी, तुला वदावे काय् ! ॥ ५ ॥

जीर्ण कातडे भुजग टाकितो
घरटे नूतन विहग बांधितो

कुणास नाही वाटत कांही कधिही त्यात अपाय् ॥ ६ ॥

भगवद्‌गीता करिशि मुखोद्‌गत,
' जुने टाकणे आत्म्याची गत '

कथिशी लोकां, सर्व तुझी ती पोपटपंची काय् ? ॥ ७ ॥

वृद्ध जाहली रूढी-आजी
मरण तियेचे खचितचि आजी

खुशाल मरु दे, मुळी गरज ना मोकलण्याची धाय् ॥ ८ ॥

कोल्हापूर : ११-६-३८

# चिमण्या

असे प्रभाती गुंगीत
मधुर गुलाबी थंडीत
येइ कशाने तरि जाग
बघतो तों फुलली बाग
चिवचिवती चिमण्या चिमण्या
दिसति किती गोजिरवाण्या !
        आनंदाने
        स्वच्छंदाने
नाचति उडती बागडती
करिति मजेचे खेळ किती !

कुणि बसुनी वेलीवरती
मौजेने झोके घेती
पानांमाजी घनदाट
लपण्याचा घालिति घाट
क्षणि उडुनी फांदीवरती
झणि करिती तिज पुष्पवती
        घेती फिरक्या
        मारिति गिरक्या
पटकन् येती भूवरती
टपकन् अन् दाणे टिपती

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
काव्य
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

हौदावरि जाउनि कोणी
पहा कसे प्राशिति पाणी
उडविति पाणी पंखात
फडफड करितो रंगात
चोचीमधि घालती चोची
कुणि लटके दुसऱ्या बोची
चिव चिव चिव चिव
मधु कूजन रव
गाति, जगा उल्हासविती
चंचल ह्या उत्सव मूर्ती

धूसर करडा वर्ण, सरी
मोर किरांची न ये जरी
तरि त्या मजला आवडती
भिन्नचि असते आवड ती!
मानेची किति ही ऐट !
चालीचा मारू थाट
टुणटुणु मारिति सदा उड्या
पोरींच्या जणु दोर-उड्या
लुकलुकते डोळे इवले
गुंजांचे काळ्या केले
बघती त्या इकडे तिकडे

वरती खाली चोहिकडे
लव जरि लागे चाहूल
पळ न ठेविती पाऊल
येती खाली एकेक
जाता परि होती एक
येती झर्कन
फिरती गर्कन
भुर्कन उडुनी त्या जाती
वर्णु कशी मी गंमत ती !

या चिमण्यांनो मजपाशी
भिऊ नका ' बांधिन पाशी '
घेउनिया करि प्रेमाने
घालिन मी खाया दाणे
मउमउ तुमची पंख-पिसे
कुरवाळिन कोमळ स्पर्शे
ठेवुन अंकी गाईन
' अंगाई, ' अन् चुंबीन
असते जर मजला पंख
भरारतो तर निःशंक

येतो तुमच्या कळपांत
तुमच्यासम गाणी गात
गतीस माझ्या मर्यादा
म्हणुन तुम्हा घालित सादा
या या मजला बिलगाया
चिव चिव चिव गाणी गाया

मुंबई : ११-१२-४०

# आकाश ठेंगणे झाले

आकाश ठेंगणे झाले
हातात स्वर्गसुख आले माझिया ॥१॥

गगनास पोचले हात
गवसला चंद्रमा त्यांत हा पहा ॥२॥

कौमुदीत विलसे धवल
इंद्रधनूयुग हे नवल नाहि का ? ॥३॥

परि नवल नसे हे एक
नवलांचे आले पीक वाटते ॥४॥

हे पहा गुलाबी कोडे
सुटता न सुटे. मन वेडे जाहले ॥५॥

चंद्रास नित्य ह्या ग्रहण
परि हसे, दिसे ना खिन्न हा कदा ॥६॥

स्रवतसे सुधेचे बिंदू
निष्कलंक हा मम इंदू सारखा ॥७॥

आकंठ सुधा ती प्यालो
अमरांसम अमरचि झालो मी अता ॥८॥

मुंबई : २-१२-३९

# साद आणि साथ

(रूढीविरुद्ध वर्तनामुळे एका प्रणयी युगलाच्या झालेल्या छळाची प्रतिक्रिया ह्या द्वंद्वगीतात वर्णिली आहे.)

चल रे राया
धरुनि करा या
दूर कुठेतरि
चल विहराया ॥ १ ॥

चल चल राणी
जाऊ रानी
स्वातंत्र्याची
गाऊ गाणी ॥२॥

गमे सकलिका
'फुलली कलिका
खुडुनि टाकु मग
सेविल अलि का ?'॥३॥

सुमें फुलावे
स्मिते खुलावे
सुगंध विखरित
मुदे डुलावे ॥ ४ ॥

रूढी—बंधन
विचित्र गुंफण
खाई शेता
बघ हें कुंपण ।। ५ ।।

रेशिम-तंतू
गुंफित जंतू
नकळे मृत्यू—
पाश परंतु ! ।। ६ ।।

स्वतः न घ्यावे
दुजा न द्यावे
वृत्ति अधम किति
किति सोसावे ? ।। ७ ।।

दोन दिसांचे
जीवन साचे
कशास पर्वा
कोण कुणाचे ! ।। ८ ।।

रूढी-कारा
होइ न थारा
स्वातंत्र्याचा
येथ न वारा ।। ९ ।।

दोघे झगडू
बेड्या तोडू
सुख शोधाया
चल ये दौडू ॥ १० ॥

(आता ती रानात आली आहेत)

हिरवळिवरि या
चल लव बसुया
गळा घालुनी
गळा, हसूया ॥ ११ ॥

मृदुल तृणाचे
हरित गालिचे
गुलाब फुलती
मधी, गालिंचे ॥ १२ ॥

बोल जिवांचे
खोल इजांचे
कथुनि शमवुया
कढ अंतरिंचे ॥ १३ ॥

मान खालती
स्कंधावरती
मनमुराद अन्
रडुया सुदती ।। १४ ।।

टपोर काळे
रोखू डोळे
करू गुदगुल्या
खोडया चाळे ।। १५ ।।

गालावरती
मारू टिचकी
हनू उचलुनी
हसू उगिच की ।। १६ ।।

एक सुराने
गाऊ गाणे
संगीताने
भरु ही राने ।। १७ ।।

मारु अंबरी
भुर्र भरारी
घेत प्रीतिच्या
मधुर लकेरी ।। १८ ।।

मम अंकी निज
करु या हितगुज
लाडिक थोडी
कानी कुजबुज ।। १९ ।।

सरता चंचल
धरु करि अंचल
उडती भुरुभुरु
बसवू कुंतल।। २० ।।

बोलू हासू
गाऊ नाचू
खेळू खिदळू
ढाळू आसू ।। २१ ।।

अमोल जीवन
करू विकासन
शक्य तरिच ते
चिर मधुमीलन ।।२२।।

* * *

जनि जे रुसले
विजनी वसले
हिंडुनि धुंडुनि
अम्हा गवसले । २३ ।।

तू मजपाशी
बाहूपाशी
खुशाल आवाहू
मरणाशी ।। २४ ।।

## तारका

अहा मनोहर मूर्ति कुणाच्या गगनी लुकलुकती
    न कळे मजला हेतु तयांचा, गुंगुन जाय मती ॥ १ ॥
गगनप्रांती पडला पाउस सुवर्ण मुद्रांचा
    किंवा फिरतो काय तेथ हा थवा काजव्यांचा ? ॥ २ ॥
कीं रवि तापे त्रासुनि लपले देवांचे बाळ
    सूर्यास्ती मग येत अंगणी खेळण्यास खेळ ? ॥ ३ ॥
चंदाराणी खेळे किंवा कवड्यांच्या खेळा ?
    निशा नेसली काय खडीची काळी चंद्रकळा ? ॥ ४ ॥
नवल जाहले, दिसू लागला तळ क्षीराब्धीचा
    साठा त्यातिल काय आणखी मौक्तिक-शुक्तींचा ॥ ५ ॥
कीं गगनाच्या नील सरोवरि प्रफुल्ल ही कमळे ?
    कीं सोन्याचे हंस त्यामध्ये पोहति हे सगळे ? ॥ ६ ॥
नंदनवनि का पारिजातका बहर आज येत
    सडा पसरला शुभ्र सुमांचा स्वर्ग करित श्वेत ? ॥ ७ ॥
संध्या-सविता-संगम समयी स्वर्गिय सुर सु-मने
    उधळुनि गेले काय तयांवरि सुवर्ण ही सुमने ? ॥ ८ ॥
किंवा तुटली श्री विष्णूची वैजयंति माळ
    विखरुनि मोती पसरुनि जाती अशी रानमाळ ? ॥ ९ ॥
किंवा सारा असे पसारा दिव्य पिसारांचा
    मोर नाचतो सरस्वतीचा आनंदे साचा ? ॥ १० ॥
देव-दिवाळी म्हणुनी केली काय रोषणाई
    इंद्र-सभेतिल विद्युद्दीपकपंक्ति असे काही ? ॥ ११ ॥

जागा भरली फुलाबाज्यांच्या दिव्य स्फुलिंगांनी ?
नभःप्रांगणी रंगवल्लिका काढिलि वा कोणी ? ॥ १२ ॥
घेउनिया का बसे चंद्रिका आरति करण्याला
लक्ष-ज्योतिचा नीरांजन हा चंद्रवल्लभाला ? ॥ १३ ॥
इंद्र पाहतो काय धरेला सहस्त्र नेत्रांनी ?
गगन छताला शोभवि कुणि वा झुंबरहंड्यांनी ? ॥ १४ ॥
तेहतिस कोटी असती अथवा ही देवागारे ?
स्वर्गंगेतुनि काय उडाले तुषारकण सारे ? ॥ १५ ॥
अंबरसागरि दीपस्तंभचि का हे चोहिकडे ?
पडता खाली होत विजेचे का तुकडे तुकडे ? ॥ १६ ॥
काय विमाने गंधर्वांची अथवा ही फिरती ?
सुधा-कुंभ वा हे स्वर्गीचे दृश्यमान होती ? ॥ १७ ॥
रजनी निजवी खेळुनि दमल्या रविबाळा तान्ह्या
काय टांगल्या हिंदोळ्यावर रंगित ह्या चिमण्या ॥ १८ ॥

* * *

सौख्य-सुधेची करिती पूर्ती सुरम्य ह्या मूर्ती
देखुनि कविला कां नच मोहिल नव-कवन-स्फूर्ती ? ॥ १९ ॥

**मुंबई : डिसेंबर १९४०**

# छकुले, कर बघु अंगाई

नीज कुठे जाई,
छकुले, कर बघु अंगाई ॥ ध्रु ॥

भातुकलीचा कशा पसारा
वेळ असे तव नव संसारा
मार्गक्रमाया हा काटेरा
करिसि कशा घाई छकुले० ॥१॥

स्वार्थि जगाचे व्यूह भेदिता
न्यायासाठी तसे झगडता
अनाथ पतितां वाली होतां
उसंत मग नाही छकुले० ॥२॥

झोपायाचे हेच तुझे दिन
जो न करपले चिंतेने मन
बहुमोलाचे हे तव जीवन
न कळे तुज बाई ! छकुले० ॥३॥

मुंबई : डिसेंबर ४६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२७७३
दा. क्र. २३८६०
काव्य मेघदूत
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

मम नामाला मनात जपशी
परी न वदण्या जनात जपशी
नयन भरुन मम फोटो बघशी
मम सन्निध मुख खाली कां ? ॥ ८ ॥

खूप वदाया मजशि इच्छिशी
कां बावरशी अस्फुट वदशी
रूसव्याचे जें सोंग आणिशी
मला पाहता पळते कां ? ॥ ९ ॥

गूढ प्रीतिचे हें उकलाया
नियम तियेचे अन् बसवाया
प्रयत्न केले, गेले वाया,
ब्रह्मगांठ प्रीतीची कां ? ॥ १० ॥

मुंबई : १०–१२–३९

# चकोरान्योक्ति

कोणी एक चकोर पाहुनि नभी चंद्रास त्या एकदा
बोले, 'अर्पिन जीविता, धरुनिया तो ध्यास तूझा सदा
नक्षत्रे सगळी वरी दिसति ही दृष्टीस माझ्या, जरी
एकाहूनि सुरेख एक, तुजला अर्पीन काया परी "

" आहे हेतु तुझा उदात्तहि तसा नामी चकोरा, अती
आहे काय तथापि जाणिव परी त्याची निशेच्या पती ?
पक्षी लाख तुझ्यासमान असती आशेवरी त्याचिया,
काहीएक विशेष त्याहुनि असे तूझ्यात काय व्दिजा ?"

कोल्हापूर : १९३६

# कावळ्याचे गाऱ्हाणे

असुनी सद्‌गुण अंगी माझी किंमत कमती करिती ॥ ध्रु ॥

असता एकचि दृष्टी मजला
सहज पाहतो सर्व जगाला
असुनी गुण, परि निंदा त्याची
' काकदृष्टि ' अशि करिती ! ॥ १ ॥

सहस्त्र वर्षे राखित काया
पूर्ण निरोगी, जाउनि वाया
आंघोळीला ओंगळ उपमा
स्नानाची मम देती ॥ २ ॥

सरितेपरि मी घाण नाशितो
जगता सर्व स्वच्छ राखितो
परंतु तटिनी ठरुनि मंगला
मजशि अमंगल म्हणती ! ॥ ३ ॥

मंजुळ शब्दें झोप न उडते
गुंगी उलटी मात्र वाढते
' म्हणुनि मारितों हाक सकाळी '
कोकिल परि आवडती ! ॥ ४ ॥

काकबलीचा भात भक्षण्या
पितरांच्या पिंडांना शिवण्या
मानहि असता अस्पृश्यापरि
हे जन मज वागविती ! ॥ ५ ॥

संकटि पडतां म्हणती ‘ काका, ’
आर्जवुनी अति मारिति हांका
गरज संपता घेउनि धोंडा
पाठलाग मग करिती ॥ ६ ॥

कोकिळास जरि मीच उबविले
लालन-पालन-गायन केलें
चेला ठरला गानपटू, ‘ मज
गायन गंध न ’ वदती ॥ ७ ॥

वसंति केवळ कोकिळ गातो
मम गीता म्हणती ‘ आरडतो ’
अती परिचये होत अवज्ञा
हीच जगाची रीति ! ॥ ८ ॥

कोल्हापूर : ४-७-३७

# एकच उपाय

रस्त्यामधुनी सायंकाळी असता रेंगाळत
कुणी नागिणी चमकत येता देखियली अवचित
फडा उभविली, रुळे शेपटा पाठीवरुनी पहा
खुले आकडा मानेवरती, कुणा न वाटे दहा ?
अंगकांति तेजाळ, लवथवे सोन्याची जणु छडी
नव्हे—पावक ज्वाला येई भस्म कराया कुडी !
शांत मुले, बायका, वृद्धही मानुनि धामण जिला
मर्दांच्या परि शरिरी काटा दचकति पाहुनि तिला
स्पर्श कोठला,—नसे सावली, एक दृष्टिपात
जहर भयंकर, जळू लागलो, होइ गमे घात
व्यर्थ औषधे तुमची सारी, उपाय एकचि करा
कडकडून नागीण डंखवा, तरीच होइन बरा.

मुंबई : ११-२-४२

# अन्यायाते साहु नको मुळि

अवचित चुंबन तुझ्या गोबऱ्या गालाचे घेता
'विनासंमती' म्हणुनी रुसलिस कळले मज आता

होउ नये ती गोष्ट जाहली नाहिशी न होई
परिमार्जन परि हो दोषाचे, हीच मला घाई

एकाबदली तयार दोन्ही हे माझे गाल
मुखा न उघडिन, चुंबचुंबुनी जरि करिशी लाल

प्रमाद घडण्या साधन हो जें, मम तोंडाला ह्या
शासन म्हणुनी तयार कधिचा, तव तोंडी द्याया

समतेच्या ह्या युगात सखये, राहु नको अबला
अन्यायाते साहु नको मुळि, सत्वर घे बदला

मुंबई : २०-४-५०

# सखीस-

" काय जाहले तुजशी सांग ना सखे ?
राहु नको मुग्ध अशी हृदयवल्लभे

डोळे तव डबडबले आंसवे किती !
बोल बोल जलदि सारि टाकुनी भिती

पाहुनिया सुंदरि, मुखकमल हें असे
म्लान तुझे, मन्मनही व्यथित होतसे

कठिण काय वाटतसे जावया मनी
माहेरी, मजशि एकटाच टाकुनी ?

' काकूंना काल पुत्ररत्न जाहले
अपुल्याशी नाहिं अजुनि ' काय वाटले ?

वस्त्र नवें तुजशि हवें म्हणुन सोडिशी
अस्त्र तुझे रामबाण काय ? वद मशी

' शांताबाईस आज घेतली सरी
तुजशि नाहिं म्हणुनि काय लोटती ' सरी ' ?

रिस्टवॉच मम तुजशी पाहिजे तरी
देतो, परि शब्द एक बोल माधुरी

‘ बाहेरुनि यावयास वेळ जाहला
अजि मजला, म्हणुनि काय विरह वाटला ?

‘ शीर्ष काय दुखत तुझे ? सांग झडकरी
अमृतांजनाचि कुपी देइ मम करीं

‘ अधिक उणा शब्द कधीं चुकुन बोलतो
क्षमा करी मज, बघ हा पदर पसरतो

* * *

‘ इश्श गडे, काहितरि काय बोलणे !
टाकिन का कधितरि अपुल्याशि बोलणे ?

होत असे धूर फार, दमट लाकडे
पेटति नच, नयनांशी पडत साकडे !

कोल्हापूर : ५-१२-३६

# दिवाळि आली

‘ दिवाळि आली, अता फटाके, फुलबाजे, ज्योती
आणा बाबा. ’ कधीपासुनी पोरे भुणभुणती
‘ दिवाळी आली, यंदा म्हणती स्वस्त विके मोती
कुडच्यातरी मज हव्याच द्याया, ’ सुनाविते सुदती
‘ भाउबिजेला रजा न तुजला, मीच निघुनि येते
गुंडचा, बंडचा, कमा, सुमासह ’ ताई मज लिहिते
दोस्त धमकती ‘ दिवाळीत तुज गाठुनि करु हल्ला
लाडू, करंज्या, कडबोळ्यांवर मारणार डल्ला ’
दिवाळिसाठी ‘ खास सवलती ’ देती व्यापारी
संधि नको का साधाया ? जरि गरम पडे भारी !
उंचि अत्तरे, साबु, केशरे, सुवासीक तैले,
सुगंधि उटणी, गळचांत बांधिति हे फेरीवाले
जन-लज्जेस्तव चार दोन तरि लागतात घ्याया
‘ खास अंक, ’ हमखास नसूद्या वेळहि वाचाया
धर्मभगिनि मम फंड, वर्गण्या येती मागाया
‘ वर्षातुनि तर एकदाच, ’ मग नकोत का द्याया ?
गडी, शिपाई, माळी, भंगी करिती मज मुजरा
टपालवाले पोस्तासाठी लावितात नजरा
‘ दिवाळि आली ’ परी कुणाची ? प्रश्न हाच पडला
निघत दिवाळीं अमुची इकडे, दाद न कोणाला !

मुंबई : १४-१०-४५

# सवत आणिली तुला

(ही कविता कविवर्य विनायकांच्या 'हा हा हारवली सखी प्रिय चिमा माझ्या जिवाची सखी' ह्या कवितेवरून स्फुरली आहे.)

सवत आणिली तुला, ग सखये
 सवत आणिली तुला ॥ ध्रु ॥

गोरिपान, कशि छान, फटाकडि, सौंदर्या नच तुला ॥ १ ॥

तेज मुखींचे दावित हिज वश विद्या, सकला कला ॥ २ ॥

सदान्कदा कशि मुठीत राही, कष्ट न इवला मला ॥ ३ ॥

जरी चुंबितो जनांत, कोप न मनात कधि ये हिला ॥ ४ ॥

कधी गागतो, कधी डागतो, साहि मूक निश्चला ॥ ५ ॥

त्रासुनि जाता, मज रिझवाया दक्ष पुरी प्रेमला ॥ ६ ॥

पतिप्रेमास्तव देहत्यागही करित मुदे कोमला ॥ ७ ॥

जाउ नको दुरि, नाव ऐक तरि ' सिगारेट निर्मला ' ॥ ८ ॥

**मुंबई : डिसेंबर १९४४**

## टपालवाल्यास -

काय वाकडे टपालवाल्या सांग तुझे केले
म्हणुनी करिशी पक्षपात ? मन भडकुनि मम गेले

सदान्‌कदा त्या रामभाउला मनिऑर्डरि देशी
जरि लेकाचा शब्द फुकाचा गोड, वदे न तुशी !

लड्डु पार्सले, पुडे खाउचे आणिशि नेन्यांना ?
पुरी कोठडी भरली त्यांची, काय कमी त्याना ?

नवी पुस्तके, तशी मासिके, वर्तमान-पत्रे,
किमर्थ तिकडे ? ठाउक तुज ते संपादक अत्रे

किती नटींचे फोटो सुंदर नटास त्या नटव्या ?
ब्रह्मचारि तो बहकुनि गेला, कारण ह्या सटव्या ?

देशि गुलाबी पत्रें सुंदर, मिस्किल त्या तरुणा,
हाय ! कधीही माझिच तुजला येइन कां करुणा ?

कोर्ट-समन्से तशा नोटिसा माझ्या वाट्याला
गुलाब जाती दुसऱ्या हाती, धनि मी काट्याला !

दिवाळिचे तुज पोस्त न दिधले, त्यात हेत होता
पोटावरि तव पाय न यावा, हाच एक दोस्ता

घेउनि येई मनिऑर्डरि मज, देइन बक्षिसही
असो कठिण किति कुणाचिही, बेमालुम करिन सही

‘ नॉटपेड ’ वाचुनी जसेच्या तसे पाठवाया
देशिल जरि, तरि उपकारहि ना जातिल बघ वाया

लिहिशिल जरका ‘ निघुनी गेला येथुनि ’ हा शेरा
नोटिसांवरी, खाकी मित्रा, होशिल मज प्यारा

काम एवढे मजसाठी तू करिशिल जर दोस्ता,
करुनि दिवाळी देइन बघ तुज फराळ अन् पोस्ता.

मुंबई : २३–४–४५

# स्वातंत्र्यवीराची पारतंत्र्यलालसा

वीर प्रबल होत अबल नमत तुझ्या पायीं ॥ ध्रु ॥

चाप युगल जोऽडिशी
प्रखर बाण सोऽडिशी

कौशल तव देखुनिया चित्त चकित होई ॥ १ ॥

अक्षय तूणीर दोन
सर्व त्यांत मदनबाण,

नेम अचुक, हृदय पूर्ण विंधुनिया जाई ॥ २ ॥

मोहनास्त्र वश तुजला
मोहिलेस तूं मजला

व्हावया स्वतंत्र परी, आस मला नाही ॥ ३ ॥

जो अजिंक्य वीरमणी
त्यास जिंकिशी रमणी

मुक्ति नको, सौख्य मला होत बंधनीही ॥ ४ ॥

निस्सिम स्वातंत्र्य-भक्त
याचि नजरकैद सक्त

करपाशी आवळि दृढ, अन्य नको काही ! ॥ ५ ॥

कोल्हापूर : १९-६-३८

# उलटापालट

‘ देखण्याला ’ जेधवा तुज, तव गृहा मी पातलो
‘ खोड काढुन नाव ठेविन ’ हेतु माझ्या मानसी

थक्क झालो परि ‘पहाता,’ नाहि जागा दोषण्या
वाटले मज क्षणभरी की हेतु माझा भंगला !

‘ मर्द ना मी ? घेउ कैशी मग अशी माघार ही ’
तोंच सुचली युक्ति नामी, जों विचारा मी करी

‘ प्रथम ठेविन नांव तुजला चारचौघांच्यामध्यें
खोड मागाहूनि काढिन, क्रमचि केवळ उलटला !

**कोल्हापूर : १७-६-३९**

# अजब कौशल्य

पाहिले तुज तेधवा अन् तव छबी हळु चोरिली
दक्षतेने, नकळता तुज, हृदयकोशी स्थापिली

' चौर्यकर्मी एकटा मी निपुण, ' तेव्हा मानिले
' भूल ती मम ' येत कळुनी, तूच मजला जिंकिले.

चोरिले जरि चित्त मम तू, तुजहि त्याची दाद ना
अजब कौशल ! जाणिवेविण चौर्य कैसे सांग ना ?

**कोल्हापूर : १८–६–३८**

## दारोदार

अमुचा हुद्दा ' दारोदार '
कुणाचे नाही ताबेदार ॥ ध्रु ॥

भिक्षांदेही पोटासाठी एक अम्हा आधार
भिक्षेसाठी फिरुनी दारी करु सर्वा बेजार् ॥ १ ॥

करणे सर्वा समान अमुच्या हाच एक निर्धार्
अन्नवस्त्र जर मिळे फुकाचे, कशास मग घरदार् ? ॥ २ ॥

' धट्टे-कट्टे, श्रमा जरासे ' कोण तुम्ही कथणार ?
वाडवडिलहि असेच मेले, असेच अम्हि मरणार् ॥ ३ ॥

मरू उपाशी, परंतु नाही कष्ट कधी करणार
स्वातंत्र्याला टाकुनि ऐशा, गुलाम नच बनणार् ॥ ४ ॥

धर्मभावना अंध तोवरी, पोळि अम्हा मिळणार्
टाकुनिया ती, भाकर खाण्या, कोण खुळा खपणार् ?॥ ५ ॥

**नवलिहाळ : १७-५-३८**

# ढेकणाचें गर्वगीत

जनहो सगळे द्या कान
ऐका क्षणभरि मम गान
ढेकुण माझे अभिधान
कथण्या वाटे अभिमान
गनिमी हा माझा कावा
सकलाना झाला ठावा
शिवाजिला केला चेला
अटकेला झेंडा नेला
विक्रमशाली ढेकूण
घाबरती जन एकूण

बघे न मीं राजा रंक
कुबेर हा किंवा खंक
थोर असो अथवा पोर
साव दिसो अथवा चोर
रोड असो अथवा लठ्ठ
बुद्धिमंत किंवा मठ्ठ
समान मज भोंदू साधू
पाहतसे सर्वा बाधू
भेद न पाळी नरनारी
करितो सर्वांवर स्वारी

जों येथे करिती वास
तों सर्वा सासुरवास
समान मी सर्वाभूती
म्हणती मज ‘ थोर विभूती ’

कळते मजला युव-युवती
कानी जें जें कुजबुजती
लपुनी ऐकत कानात
ये न कुणाच्या ध्यानात
एकांती कांताकांत
शय्येवरि पडती शांत
करावया गंमत थोडी
हळु त्यांची काढी खोडी
होउनि जागे अनुरागे
करिती भांडण, मी भागे
कुणा न दे कधि कुणकूण
गमती जमती ढेकूण

रमणासह असुदे रमणी
चुंबित मी त्याला न गणी

सुंदरिचा गोंडस गाल
नि:संशय माझा माल
पतिव्रता असुदे ललना
मंचकि पहुडे मज भय ना
बाधेना सतिचा शाप
लागेना मजला पाप
असुदे घरचा यजमान
त्याचा मी पकडी कान
अतिथि कुणी सदना येई
त्याचाही अतिथी होई
चोर येत करण्या चोरी
त्याच्याही रुधिरा चोरी
वीर असो कितिही शूर
धीर न त्या पळतो दूर
दिसे न जरि मम दरबार
राजे वोपिती करभार
सर्व जगाचा सम्राट
कीर्ति गाति शाहिर भाट

* मसणि वसे फासे राख
शिव, कारण त्या मम धाक
कमला कमलामाजि उभी
न दुजे कारण, मजला भी!
क्षीरसागरी रमापती
लपतो, भिउनी मला अती
रवि सप्ताश्वरथी पळतो
थांबेना धाके पळ तो
उशिरा उगवे मम धाके
मृगांक तारासंग मुके
दर्शनमात्रे मम, सारे
थरथरती गगनी तारे
घेउनि भय फिरतो वारा
जगतावरि सैरावैरा
केवळ मजला भिउनि मनी
काळवंडली ती रजनी
स्मरणाने मम घाबरतो
फिकट पांढरा दिन होतो

* कमले कमला शेते हर:शेते हिमालये
क्षीराब्धौच हरि: शेते मन्ये मत्कुणशंकया – सुभाषित

पीडा ऐशी दिनि—रजनी
सौम्य त्यापुढे शनि-अशनी
जे मजला चिरडू बघती
उत्पत्तीकारण होती
पुराणि रावण अही-मही
संबंधी त्यांचा मीही
नाहि जरा मज वा मरण
रक्तबीज मी ढेकूण

वस्ती माझी जळी स्थळी
आकाशी अन् पाताळी
नगरे, ग्रामे, धराधर,
सृष्टि व्यापिली चराचर
प्रगटे अनंत रूपात
अंतर्धान क्षणी होत
स्तंभी जर हो पद-घात
करी नृसिंहासम घात
संकट पडले कधि काळी
शोधा मज हृदयाजवळी
नाहि रिता मजविण वाव
विश्वव्यापि ढेकुण देव,

मुंबई : १९४२

# कवि-कल्पना

त्या गोंडस गोऱ्या गोल कपोलां वदती
कवि ' गेंद गुलाबी, ' असुदे त्याना प्रणती
रंगले काश्मिरी सफरचंद ते गोडे
आस्वाद लाभ ज्यां, म्हणती कविना ' वेडे ' ! ॥१॥

त्या रदना वदनातिल ललनांच्या धवल
वदताती ' कलिका कुंदाच्या ह्या नवल ! '
मधु खरे मस्कती डाळिंबाचे दाणे
रुचि-लाभ मिळे ते म्हणती ' कवि बेदाणे ! ' ॥२।

सुंदरीमुखाला म्हणताती ' हें कमल , '
म्हणुदेत बिचारे, असे शहाळे विमल
कोवळे खोबरे लुसलुशीत ओठांचे
रसपान सौख्यही मिळे मधुर घोटांचे ॥३॥

* * *

कां नुमजे जगता वदति तयानाच ' कवी '
सकलांस कला की पुरी जयांची चकवी

मुंबई : १-११-३९

# स्मरण आणि उद्वेग

( कविवर्य केशवसुत ह्यांच्या 'स्मरण आणि उत्कंठा ' ह्या कवितेचे विडंबन. परिशिष्ट १ पहा. )

कोपाने, असता घरी, तुज यदा ' घोडी ' असे बाहिले,
' कां हो गर्दभराज ?' तूंहि पुशिले खिंकाळुनी तेधवा
' कां गे नागिणि तू फडा करिशि ही ?' मी बोलिलो जेधवा
फूत्कारांस करीत ' तक्षक पुरा !' तू नाम मातें दिले

' माझे धत्तुर-बी, ' यदा चिडुनिया मी तूज संबोधिली
तों ओकीत गरास ' तूच कुचला,' केली तुवा गर्जना
' कां गे ओरडशी अशी अवदसे ?' वाणी न जों बोलली
दातां चावित कर्कश ध्वनि उठे, ' दारिद्र्य-नारायणा !'

द्वेषाची भरली गटार-सरिता, आसक्त संबोधनी
ओघामाजि तिच्या पुरे उभयता तैं पावलो मज्जन !
चित्ती त्या स्मरणे तिरस्कृति सदा संदीप्त ती होउनी
संतापे तुझिया इथे तळमळे हा मी अभागी जन !

घेई धाक तुझा म्हणूनि मज दे निद्रा मुळी सोडुनी
तेणे दुर्लभ शांतिचे अहह तें स्वप्नातही दर्शन !

मुंबई : १८-११-३९

# आंबोळसि-

( कविवर्य माधव जूलियन ह्यांच्या 'ऐकव तव मधु बोल' ह्या कवितेचे विडंबन. परिशिष्ट २ पहा. )

चाखव स्वाद अमोल् एकदा ॥ ध्रु ॥

नकोच मजला चिव्डा, लाडू, चहा, शिरा, पुरि गोल्
नकोच मजला थालिपीठ, भजि, उसळ, मिसळही ओल् ॥ १ ॥

एक तुझी चव नामी अभिनव वाटे मज बिनमोल्
सकाळ नाही अजुनि संपली, दुर्लभ तू कां बोल् ? ॥ २ ॥

सुखे विसावा घेण्या जा मग फेडुनि माझे मोल्
दे शेवटची भेट बसुनिया ताटामाजी खोल् ॥ ३ ॥

पाहिन नंतर वाट दिवसभर चाटित जीभ विलोल्
नको करू पण आस एवढी ह्यावेळी मम फोल् ॥ ४ ॥

१) कोल्हापुरांत त्या काळी उडुपी उपाहारगृहांत 'आंबोळी' हा पदार्थ लोकप्रिय होता व तो फक्त सकाळीच मिळत असे.

नवलिहाळ : २२-५-३८

# भांडकुदळ

( कविवर्य माधव ज्यूलियन ह्यांच्या ' आगगाडी ' ह्या कवितेचे विडंबन. परिशिष्ट ३ पहा. )

कडाड कडाड
गडाड गडाड
भांडते ही बाई
केवढी धिटाई !
ताकद रगड
हृदय दगड
माणूस पाहून
जातसे खवळून
वसवसे वाघीण
फुसफुसे नागीण
तैशीच धुसफुसे
सारखी धुमसे
आदळ आपट
करिते चावट
अत्यंत फटकळ
मुलखाची शिवराळ
शब्दही वेचक
बोलते भेदक

अत्यंत मुर्दाड
जिभेला ना हाड
एकचि हत्यार
जिभेची तल्वार
ठावी ना माघार
करिते बेजार
कडाड कडाड
गडाड गडाड
करिते हैराण
मुलुख-मैदान
थोरात पोरात
घरात दारात
भांडते वाचाळ
सांज ना सकाळ
फोडूनी किंचाळी
बसवी काण्ठाळी
धावते भरारा
वस्त्राचा फरारा
ही आली थांबली
माणसे पांगली
कैसा मी येथून
जाईन निसटून ?

**कोल्हापूर : १९३८**

# मनी मांजरी

मनी मांजरी
वाघोबाची शोभतसे मावशी खरी !
गंमत अशी
मादी असुनिया हिला फुटली मिशी
खाउनी लोणी
अंग मऊमऊ हिचे वदती कोणी
जाय आडवी
अपशकुनिया जना मागे पाठवी
भूचर खरी
मात करितसे परी विहंगांवरी
चोरटी पुरी
हात लावण्याची छाती कोणा न परी
चोराच्या मनी
विलसते तें चांदणे हिच्या लोचनी
पद न वाजे
गुरुमाउली चोरांची नाम हें साजे
चोरी करिते
राजरोस परी घरीदारी हिंडते
चोर ती चोर
वर शिरजोर, धन्यावर गुर्गूर

मोत्या इमानी
बांधुनी बाहेरी ठेवी तयाला धनी
तया भाकर
हिला प्यावयाला नित दूध-साखर
मोत्या पायाशी
खेळतसे ही धन्याच्या अंगाखांद्याशी
आंजागोंजारी
धनी मनीला, मोत्याला हड्हड करी

* * *

न्याय जगाचा
' बेइमान घेई मान ' आहे का साचा ?

मुंबई : १९४८

## ट्रिंग ट्रिंग, ट्रिंग ट्रिंग, ट्रिंग ट्रिंग

( माझ्या कचेरीत एक प्रौढ कुमारिका काम करीत असे. बिचारीचे लग्न जमत नव्हते. एके दिवशी माझ्या टेबलावर टेलिफोन बसविण्यात आला. त्या मुलीला हे कळल्यावर तिने माझे अभिनंदन केले व ' You must give me something ' अशी मागणी केली. त्यावर तत्परतेने मी ' I shall give you a ring ' असे विनोदी उत्तर दिले. त्या प्रसंगावर आधारित ही वात्रटिका आहे.)

' गुड मॉर्निंग सर्, मनापासुनी करिते अभिनंदन् !
टेलिफोन अजि तुम्हा मिळे, मज मस्ट यू गिव्ह सम्थिंग्

सेलिब्रेट,
मस्ट यू गिव्ह सम्थिंग् '

' डोण्ट वरी मॅडम्, माय डिअर, डोण्ट वरी मेडन्
दुजे न होइल इतुके प्यारे, आय् शॅल् गिव्ह् यू अ रिंग

शुअर्ली
आय् शॅल् गिव्ह् यू अ रिंग !'

मुंबई : नोव्हेंबर १९८२

# दे रे देवा सुरेख टक्कल

साठी पडली कधीच पाठी
बुद्धिहि झाली बरीच नाठी
दातांमाजी पडल्या खिंडी
तशाच जडल्या अनेक व्याधी

अधीच झाले ‘अंगं गलितं’
अजुनि परी ना ‘मुंडं पलितं’
कृष्ण केश मम भूषण बनले
त्याने परि मज अती गांजिले

शुभ्र वदन बहुमान मिळविते
हाय ! न माझ्या भाली सुख तें
केसांचा मम करिती हेवा
कुणि न इच्छिती करण्या सेवा

गाडीतुनि नित लटकुनि जातो
वृद्ध न परि मी कुणा वाटतो
कुणि न मानिती मज ‘आजोबा’
वदती ‘मामा, आबा, बाबा’
बसण्या ना कुणि जागा देती
जवळी जाता तरुणि बिचकती

पिकल्या केसां करण्या काळे
कधीपासुनी कलप निघाले
काळ्यांचे परि धवल बनविण्या
हाय ! न सुचते कुणा कल्पना

दुःखाचा मम होण्या शेवट
सुचली फक्कड मजला शक्कल
बदली घेरे माझी अक्कल
दे परि देवा, सुरेख टक्कल

**मुंबई : डिसेंबर ८२**

# निघुनी ये सखि

निघुनी ये सखि लवलाही
तुजविण लव करमत नाही ॥ ध्रु ॥
उष्मा— छे ! अंगार खरा
उकडुनि जाई जीव पुरा
झोपेविण निशि तळमळतो
कुशीकुशीवर वळवळतो
पहाटेस लागे डोळा
पुरा करी परि घोटाळा
रात असे जों, जोरात
* संयमी नळ येउनि जात
बघे सकाळी नळाकडे
खडखडाट जिकडे तिकडे
स्नान कशाचे मग घडते
मुखमार्जन जेथे अडते
होई फजिती पदोपदी
लोक हासती फिदीफिदी
तत्क्षणि स्मरणे तव राणी
नयनी ये टच्‌कन्‌ पाणी. निघुनी ये० ॥ १ ॥

* या निशा सर्वभूतानाम् । तस्याम् जागर्ति संयमी ॥ गीता

दुःखित जरि जीवा विटला
    पोटजाळ कोणा सुटला ?
चार घास मुखि कोंबाया
    भोजनगृहि लागे जाया
गाठ पडेतो ताटाची
    वळे दामटी पोटाची
पक्वान्नांचे बहु पीक
    कशी शमावी परि भूक ?
लागति दगडहि रगडावे
    जीवनकलही झगडावे
स्मरणे तत्क्षणि तव राणी
    नयनी ये टच्कन् पाणी,    निघुनी ये    ॥ २ ॥

रंजिस हें मन रिझवाया
    यत्न करितसे परि वाया
'शो'ला जाता रांगेत
    तिष्ठंती नशिबी येत
रांग कशाची तिला म्हणू
    मारुतिचे शेपूट जणू !
कधी संपता संपेना
    संपेना माझी दैना !

लगबग ये तंव कुणि युवती
   मिळवि तिकिट, हो मजपुढती
स्मरणे तत्क्षणि तव राणी
   नयनी ये टच्‌कन् पाणी.    निघुनी ये    ॥ ३ ॥

मळले बघ सारे सूट
   पॉलिश अन् मागति बूट
केसां कधि तेलहि नाही
   पुरा पुरा बनलो भाई
झुरळीं अन् उंदिर, घूस
   घरात घालिति धुडघूस,
अस्ताव्यस्तहि सामान,
   धुरळा काढी वर मान,
वदती कुणि ' फुलबागेच्या
   उकीरडा झाला साचा '
स्मरणे तत्क्षणि तव राणी
   नयनी ये टच्‌कन् पाणी.    निघुनी ये    ॥ ४ ॥

मुंबई : ६–७–४७

# बाइ एक द्या मज कुणि आणुनि

बाइ एक द्यां मज कुणि आणुनि
कामपूर्ति जी करील माझी
नका हासु वा मारू डोळा
सांबापरि मी साधाभोळा !
'काम' शब्द नच संस्कृतमधला
भाव जयाचा पूर्ण आगळा
'काम' शब्द मम मराठमोळा
बाइ हवी घरकामासाठी

त्वचा रोग तिज फार नसावा
घाम न तैसा फार गळावा
नाकि नको मुळि पातळ शेंबुड
खाद्यपदार्थी करि जो लुडबुड
खोटी व्याधी तिला न व्हावी
कार्यप्रसंगी मदत मिळावी
फार नसावा दमा खोकला
बाइ अशी द्या मज कुणि आणुनि

भाली आठ्या फार नसाव्या
मुखडा फार न दुर्मुखलेला
मुखस्तंभ ना, फार न उद्धट
तशी करु नये फारच वटवट

सेवा करण्या अम्हास लावी
अशी वृद्धही फार नसावी
असु दे काळी अथवा नकटी
परी नसावी फार छाकटी
जाय बायको कधि माहेरी
द्यावी स्कंधी जबाबदारी
सोडावी परि नच मर्यादा
लावु नये मज अपुल्या नादा
सौ. ला होइ न संशयबाधा
अशी बाइ मज द्या कुणि आणुनि

भांड्यां पोचे फार न यावे
कपडे कोरे नच फाटावे
काच माल ना नित्य फुटावा
जागृत करण्या वेळ न यावा
फार तिखट वा नकोच कच्चा
जळका, खारट पाक हमेशा
मलई सगळी तिने न खावी
मुलांस थोडीतरि राखावी
शिळे अन्न ना फार उरावे
थोडे आमुच्यासंगे खावे

व्रतवैकल्ये फार करीना
रोज फळांची आस धरीना
अशी बाइ मज द्या कुणि आणुनि

मुलांस क्वचितच कोंडुनि घाली
सदान् कदा ना करि कागाळी
फटके चटके दे न फारशी
रोज न ठेवी तया उपाशी
* रक्त तयांचे क्वचितच काढी
मुले पळविणे मनी न आणी
बाइ अशी मज द्या कुणि आणुनि

वेळि अवेळी जाई बाहिर
शेजघराचे करि अंतःपुर
पलंग, गादी यांचा वापर
करिते मित्रांना पाचारुन
अनेक लफडी नित्य करितसे
मला गोवण्या त्यांत बघतसे
अशी बाइ ती परी नसावी

कधी तिने बाजार करावा
हिशेब पैशांचा परि द्यावा

* पुण्यात एके ठिकाणी मुलांचे रक्त विकण्याचा प्रकार उघडकीस आला.

फार नसावी ती हाताळू

स्वभाव नच वा अति विसराळू
काम संपवित टी. व्हि पहावा
फोनहि कधितरी जरुर करावा
विविध-भारती गाणी लावुन
विरंगुळाही जरूर घ्यावा
पानांचा परि भरुनि तोबरा
रंगविना जी भिंति घराच्या
अशी बाइ मज द्या कुणि आणुनि

पत्ता पुरता तिचा मिळावा
फोटो संग्रहि एक असावा
काळ्या यादित नाव जिचे ना
बाइ अशी मज द्या कुणि आणुनि

**मुंबई : २६-११-८२**

# दवडु नको संधी

द्याया भाजी मंडइमाजी गेलो त्या दिवशी
स्मरतो पक्का, नाजुक धक्का तूंच दिला मजशी
स्थलकालाचा विस्मर पडला, होउनि बेभान
मधुर मधुर अधराचे केले अधिरतया पान
'शर्म असे का मेल्या तुजला?' घनगर्जा झाली
बसे फाडकन् नाजुक चप्पल मम डाव्या गाली
इंद्रधनूपरि भृकुटि वाकुनी घळघळ ओघळती
सर अश्रूंचे पुसावया तव, मज कुठली छाती !
क्षुब्ध समाजा भिउनी, गुपचुप सूबाल्या केला
चप्पल कसली — प्रसाद तव -- परि बरोबरी नेला
टाच लागुनी लाल जाहला रक्ताने गाल
जखम गुलाबी कोडग्याची करि मम पुरते हाल
परि हालाते, अपमानाते, मानिल का कामी ?
येइ न मागे प्रेमासाठी यावयास कामी !
दग्ध अंग जरि पतंग तरि का सोडिल ज्योतीला ?
बसला बडगा तरी कोडगा बोका मलईला ?
एक मुका कामुका मिळावा, मुकावया होई
अन्य सुखांना पुरी तयारी, नवल नसे काही
टक्कर होउनी पुनरपि चढण्या लालि दुज्या गाली
चक्कर घाली नेमाने, परि दिसे न तें भाली
'सखे, लाडके, प्रिये, जिवलगे, ये दर्शन द्याया
कितिक दिसांचे तप आचरितो तव चप्पल खाया,

दुसरी चप्पल घेउनि पुनरपि मार एकवार
वार करिल तव, मम दुःखाचा समूळ संहार,
भक्त तुझा मग शक्तहि होअिल पूजा बांधाया,
चपलांची तव निदान, जरि मज दुर्लभ तव काया
'मर्द कशाचा कुसुमांसम जो मानि न जखमांते ?
कसला प्रेमी, वंदि न शिरसा प्रिया- पादुकांते ?
खिशात चप्पल, सदा गुणगुणे हें गाणे तोंडी
चिंता बहुतां 'कशी फुटावी प्रेमाची कोंडी ?'
दोस्त विनविती 'नाद सोड हा चतुर्भूज होई,'
वधूपित्यांचा क्यू दाराशी नित वाढत जाई
कुणी सांगती, 'एकच मुलगी, घरजावइ व्हा ना'
कुणी बोलती 'झाला असता कुबेर एव्हाना!'
कुणी प्रवचती तिंबूनाना, * भूतदया-शास्त्र,
कुणी धमकती निर्वाणीचे सत्याग्रह-अस्त्र
जीवहि हल्लख्, हल्ल्यांनी ह्या भंडावुनि गेला
मार्ग काढण्या वधुव्यूहातुन 'पण' जाहिर केला
" गालावरल्या जखमेचे मम रहस्य भेदिल जी,
तव चप्पल हो फिट्ट पदाला, तीच वधू माझी "
इंगित ह्यातिल जाणुनि तूं हो संधी दवडु नये
गुपीत उघडे, जग न भाबडे, बनदिल मज सखये !

* ठकीचे तिंबूनाना

मुंबई : १९७०

# संपादकास

अजि निराश मज न करावे ।।ध्रु।।

बाडें कितितरि लिहिली झटपट
छापायाची चालू खटपट
अजुनि कुठे ना चाले लटपट
श्रेया घ्यावे, परि निराश मज न करावे ॥ १ ॥

विचार उष्टे, शिळ्या कल्पना,
भाषा हिणकस, शुष्क भावना,
वाक्ये चोरलि दिसती नाना,
मान्य मला हें, परि निराश मज न करावे ॥ २ ॥

मनासारखी करा दुरुस्ती
अथवा जोडा तुमची पुस्ती
लेख बदलुनी राखा नुस्ती
माझी नांवे, परि निराश मज न करावे ॥ ३ ॥

जाहिरातिच्या दुप्पट बदला
देतो रोकड, जर तुम्हि वदला
अथवा सुचवा मार्गहि मधला,
गुज सांगावे, परि निराश मज न करावे ॥ ४ ॥

विनंति माझी ही संपादक,
नका नका हो मानू बाधक,
संधी द्या मज बनण्या लेखक,
प्रार्थित भावे, अजि निराश मज न करावे ॥ ५ ॥

**कोल्हापूर : १९३८**

REFBK-0023870
REFBK-0023870

## स्मरण आणि उत्कंठा

एकांती असता घरी तुज सखे ' हे सारिके ' बाहिले
' हे माझे शुकराज, ' हें म्हणुनि तूं मातें मिठी मारिली
' माझे जातिलते, ' म्हणून तुजला मीं गाढ आलिंगिली
तों ' माझे सहकार, ' हे मधुर गे तूं नाम मातें दिले
' माझे रम्यविहार पुष्करिणि गे, ' मी तूज संबोधिले
' माझे मानसहंस हो, ' सरस हें वाणी तुझी बोलली
' क्रीडासिंधुमधील हे मम तरी, ' ही साद मी घातली
' माझे नाविक हो प्रवीण, ' म्हणूनी मातें तुवा चुंबिले!
प्रीतीची सरिता उचंबळुनि त्या आसक्त संबोधनी
ओघामाजि तिच्या प्रिये, उभयता तैं पावलो मज्जन !
उत्कंठा हृदयात तें स्मरुनिया, संदीप्त ती होउनी
रात्री या विरहें तुझ्या तळमळे हा मी अभागी जन,
घेई ध्यास तुझा म्हणून मज दे निद्रा गडे सोडूनी,
तेणे दुर्लभ गे तुझे अहह! तें स्वप्नातही दर्शन —केशवसुत

## ऐकव तव मधु बोल

ऐकव तव मधु बोल, कोकिळे,
ऐकव तव मधु बोल् ।। ध्रु ।।
नकोत मजला मैना राघू साळुंकी चंडोल्
नकोत मजला विविध सुरांचे कृत्रिम ते हिंदोल् ।। १ ।।
एक तुझा स्वर आर्त खरोखर वाटे मज विनमोल्
वसंत नाही अजुनि संपला कां झालीस अबोल् ।। २ ।।
सुखे विसावा घेण्या जा मग पहावया भूगोल्
गा शेवटचा बोल लपुनही पर्णामाजी खोल ।। ३ ।।
पाहिन नंतर वाट वर्षभर दाबुनि चित्त विलोल्
नको करू पण आस एवढी जाता जाता फोल् ।। ४।। —माधव ज्यूलियन

## परिशिष्ट ३ ( संदर्भासाठी )

### आगगाडी

धडाड धडाड खडाड खडाड
धावते ही गाडी केवढी धडाडी !
खाऊन रगड काजळी दगड
पाण्याचे रांजण घोटांत पिऊन
फुस्‌फुसे नागीण वाऱ्याची बहीण
तोंडाने जळते सर्वांग वळते
पाठीचे मणके पोकळ टणके
टाकिते तोडून घेतेही जोडून
माणसे पोटांत बसती थाटात
धावे ही आगिन गाडीची नागीण
डोंगर बिळात शिरून पळत
नदीला ओलांडी न जाय झोकांडी
पुलाची घर्घर टाकून सत्वर
खडाड खडाड धडाड धडाड
दूर हो वाघीण अशी ही नागीण
फोडून किंचाळी बसवी काण्ठाळी
धुराचा फवारा झेंड्याचा फरारा
काजळी हवेत प्रवाह समेत
दिवसा दुपारी रात्रीच्या अंधारी
थंडीत वाऱ्यात पाऊस पाण्यात

दा. क्र. २३८५०
काव्य

करीत फुम्पाट धावते अचाट
रात्रीच्या प्रहरी शोभे ही सुंदरी
खालती तुटला तारा हा कुठला?
रांगेने वाटती काजवे धावती
डोळयांत या गोल विजेचा कल्लोळ
ही आली थांबली माणसे धावली
तांबडा तो दिवा झालाच हिरवा
ऐटीने एंजिन कधी मी हाकीन ?
वाटेत फाटक करिते अटक
वाजली ही शीट परंतु तिकीट ?

—माधव ज्यूलियन

## शुद्धिपत्र

| पृष्ठांक | ओळ क्रमांक | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १ | १ | मज ही | मजही |
| ९ | ४ | का खोटी | काखोटी |
| १२ | ८ | भाळी | भाली |
| १९ | ५ | बेंचिराख | बेचिराग |
| २३ | १३ | वर्णभरी | वर्षभरी |
| २४ | १२ | घट | घर |
| ४७ | १५ | कोमळ | कोमल |
| ५६ | १ | फुलाबाज्यांच्या | फुलबाजांच्या |